नॅशनल बुक ट्रस्टचा ग्रंथ

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 9236

# भारत आज आणि उद्यां

जवाहरलाल नेहरू

REFBK-0010854

पब्लिकेशन्स डिव्हिजन

नॅशनल बुक ट्रस्टचा ग्रंथ

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम २५३६८ वि. निबंध
९२३५० २८।११।६०

भारत

# आज आणि उद्यां

( आझाद स्मारक व्याख्यानमाला, १९५९ )

जवाहरलाल नेहरू

अनुवादक

" भगीरथ "

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें
दा. क्र. 90648

REFBK-0010854

पब्लिकेशन्स डिव्हिजन,
माहिती व नभोवाणी मंत्रालय,
भारत सरकार, दिल्ली ८

पौष, १८८१ ( Pausa, 1881 )
जानेवारी, १९६० ( January, 1960 )

किंमत : ७५ नये पैसे
Price : 75 nP.

INDIA
Today & Tomorrow
*( Marathi )*

© नॅशनल बुक ट्रस्ट, ( इंडिया ), १९६०

प्रकाशक : डायरेक्टर, पब्लिकेशन्स डिव्हिजन, ओल्ड सेक्रेटॅरिअट, दिल्ली ८
मुद्रक : मा. ह. पटवर्धन, संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणें २

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें, स्थळप्रत.
अनुक्रम दि
क्रमांक नं. दि

मौलाना आझाद व्याख्यानमालेंतील पहिलें व्याख्यान देण्याची श्री. जवाहरलाल नेहरू यांना विनंति करतांना, मौलाना अबुल कलाम आझाद यांनीं भारतीय जीवनाच्या विविध क्षेत्रांत आणि साहित्यांत जी भर घातली आहे तिचा उल्लेख करणें मला अपरिहार्य वाटतें. तारुण्याच्या सुरुवातीलाच एक प्रज्ञावन्त लेखक आणि धर्मशास्त्रज्ञ म्हणून मौलाना आझादांची ख्याति झाली. परंतु ज्या गुणांमुळें त्यांना हें स्थान प्राप्त करून घेणें शक्य झालें त्या गुणांमुळेंच, केवळ शैक्षणिक क्षेत्रांत फार काळ संतुष्ट राहणें त्यांना अशक्य झालें. अनिर्बंध कुतूहलामुळें आणि सत्यान्वेषणाच्या त्यांच्या वृत्तीमुळे राजकीय चळवळींत पदार्पण करणें, त्यांना भाग पडलें. विशीच्या सुरुवातीलाच भारतीय स्वातंत्र्याचे ते लढवय्ये झाले. कारण स्वातंत्र्याच्या वातावरणाशिवाय कोणाही माणसाचा खराखुरा आणि सर्वांगीण विकास घडून येणें शक्य नाहीं या गोष्टीची त्यांना जाणीव झाली होती. वयाच्या अवघ्या पस्तिसाव्या वर्षीच,त्यांना भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षपदावर निवडून भारतीय जनतेनें त्यांचा बहुमान केला. नंतर स्वातंत्र्य-लढयाच्या अत्यंत आणीबाणीच्या काळांत त्यांनीं काँग्रेसच्या भवितव्याचें, सहा महत्त्वपूर्ण वर्षे मार्गदर्शन केलें. १९४२ चा लढा चालू असतांना आणि सर स्ट्रॅफर्ड क्रिप्स्, लॉर्ड वेव्हेल आणि ब्रिटिश मंत्रिमंडळाचें शिष्टमंडळ यांच्याशीं वाटाघाटी चालू असतांना, ते काँग्रेसचे अध्यक्ष होते.

स्वातंत्र्याच्या प्रेमानेंच विद्वान् मौलाना आझादांना निडर राजकीय योद्धा बनवलें. त्याच प्रेमामुळें भारतीय जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्यें प्रागतिकतेचे आणि बुद्धिवादाचे ते निर्भीड पुरस्कर्ते झाले. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय, त्याचप्रमाणें नैतिक आणि धार्मिक प्रश्न, भावनेच्या आहारीं न जातां अलिप्ततेच्या वृत्तीनें सोडवण्याचा त्यांचा सतत प्रयत्न असे. स्वातंत्र्य आणि न्याय, ह्यांना ते जीवनाचीं मार्गदर्शक तत्त्वें मानीत असत आणि भाषा, धर्म किंवा जात यांपैकीं कशाचाही विचार न करतां या तत्त्वांचा लाभ भारतीय जनतेंतील सर्व वर्गांना मिळावा असा त्यांचा प्रयत्न असे.

सुस्पष्ट विचार आणि समतोल आणि समंजस निर्णय हे त्यांच्या मनाचे दोन उल्लेखनीय गुण होते. कोणताही प्रश्न सोडवतांना इतर सर्व क्षुल्लक आणि असंबद्ध मुद्दे बाजूला सारून, त्या प्रश्नाच्या मूळ मुद्दयाला ते ताबडतोब हात घालीत असत. त्यांच्या ह्या नीरक्षीर विवेकबुद्धीला न्यायाच्या आणि समतेच्या जाणिवेची जोड कायम लाभलेली होती. कोणत्याही प्रश्नाचा एकांगी विचार ते कधींही करीत नसत आणि भिन्न मतांचा विचार करण्याला ते

सदैव तयार असत. एकाद्या व्यक्तीविषयींच्या पसंती किंवा नापसंतीमुळें त्यांच्या निर्णयाला क्वचितच बाध येत असे. बौद्धिक दृष्टिकोणांतून अलिप्तपणें विचार करण्याची त्यांची वृत्ति आणि भिन्न दृष्टिकोण विचारांत घेण्याची त्यांची शक्ति, यांमुळें ते जें कांहीं बोलत असत त्याला एक प्रकारचें विशिष्ट महत्त्व प्राप्त होत असे.

मौलाना आझादांचा पिंड विद्वानाचा होता. परंतु परिस्थितीच्या दडपणानें त्यांना राजकारणांत ओढलें. प्रसिद्धि टाळण्याचा त्यांचा प्रयत्न हाच त्यांच्या विद्वत्तेचा स्पष्ट पुरावा आहे. भारतांतील किंवा इतर कुठल्याही राजकीय नेत्यांची लोकप्रियता, सर्वसाधारणपणें, बहुजनसमाजाशीं असलेल्या त्यांच्या संपर्कामध्यें सामावलेली असते. परंतु मौलाना आझाद हे स्वभावतःच योगी होते. राजकारणाच्या आखाड्यांत उतरण्यापेक्षां एकांतांत अभ्यास करणेंच त्यांना अधिक पसंत होतें. त्यांच्या संकोची आणि प्रसिद्धिविन्मुख स्वभावामुळें ते भारतीय जनतेला अधिकच लोकप्रिय झाले. त्यांच्या मृत्यूनंतर जनतेनें, अमर्याद दुःखाची आणि नितांत आदराची जी भावना व्यक्त केली तशी ती गांधीजींच्या हौतात्म्याच्या प्रसंगाव्यतिरिक्त इतर केव्हांही व्यक्त केलेली नाहीं.

मौलाना आझादांच्या निधनामुळें सांस्कृतिक संबंधविषयक भारतीय मंडळ, आपल्या एकमेव अध्यक्षालाच नव्हे तर त्याच्या स्थापनेच्या सुरुवातीपासून त्याच्या कार्याला सतत स्फूर्ति देणाऱ्या व्यक्तीलाही मुकलें. तेव्हां त्यांच्या स्मृतिसन्मानार्थ “ आझाद स्मारक व्याख्यानमाला ” सुरू करावी आणि भारताच्या खास अनुषंगानें मानवी विकासाविषयीं किंवा कल्याणाविषयींच्या कोणत्या तरी प्रश्नावर या मालेंतील पुष्प गुंफण्याचें आमंत्रण, भारतांतील किंवा परदेशांतील नामवन्त विद्वानांना द्यावें असें या मंडळानें ठरवलें.

मौलाना आझाद हे एक मानवतावादी होते. मानवी विचाराच्या, भावनेच्या आणि कृतीच्या प्रत्येक अंगोपांगाविषयीं त्यांना कुतूहल होतें. या व्याख्यान-मालेमुळें, भिन्न भिन्न राष्ट्रांच्यामध्यें परस्परांविषयीं अधिक जाणीव निर्माण होण्याला आणि आज जगामध्यें ज्या कांहीं तेढीच्या भावना निर्माण झाल्या आहेत त्या नाहींशा करण्याला महत्त्वपूर्ण मदत होईल अशी मंडळाला आशा आहे.

या व्याख्यानमालेंतील पहिलें पुष्प गुंफण्याचें श्री. जवाहरलाल नेहरू यांनीं मान्य केलें हें आपलें एक सद्भाग्यच आहे. एक मुत्सद्दी आणि आंतर्राष्ट्रीय ख्यातीचे लेखक या नात्यानें श्री. नेहरूंचें स्थान काय आहे, तें मीं सांगण्याची गरज नाहीं. परंतु एक विचारवन्त, एक लेखक आणि एक कार्यकर्ता या नात्यानें त्यांच्या ठिकाणीं प्रकर्षानें दिसून येणाऱ्या आत्यंतिक कळकळीविषयीं मी

बोलणार आहे. मनांत विचार येतांच त्याच्या पाठोपाठ अनुभूति आणि लगेच कृति असा त्यांचा स्वभावधर्म आहे. अशा प्रकारची जलद प्रक्रिया मंद मनाला गोंधळून टाकते आणि कधीं कधीं अस्वस्थ करतें. परंतु तिच्यामुळेंच आत्यंन्तिक कळकळीची साक्ष पटते आणि विचारांत बदल होण्याला सहसा वाव राहात नाहीं.

कळकळ ही व्यक्तीची एकात्मता घडवून आणते आणि हेंच पंडित नेहरूंच्या जीवसपणाचें आणि सामर्थ्याचें रहस्य आहे. बंदिवास व्यक्तिमत्त्व कसोटीला लावतो. बंदिवासामुळें भोगाव्या लागणाऱ्या शारीरिक हालअपेष्टांपेक्षां मनाच्या समतोलपणावर त्यामुळें पडणारा ताणच माणसाला अधिक जाणवतो. नित्याच्या व्यवहारांना बंदी झाली आणि इतर कुणालाहि भेटण्याची संधि नाकारली गेली, म्हणजे माणूस स्वतःच्याच विचारांच्या, भावनांच्या आणि इच्छाशक्तीच्या आधारावर जीवन जगण्याचा प्रयत्न करतो. बंदिवासांतील सक्तीची निष्क्रियता मनस्वी ताण पाडणारी असते आणि त्या माणसाच्या ठिकाणीं उत्साह आणि शक्ति जितकी अधिक तितक्याच प्रमाणांत तो ताणही अधिक असतो. याच कारणामुळें बंदिवासांत पडलेल्या अनेक राजकीय नेत्यांची मानसिक नसली तरी शारीरिक हानि निश्चित होते. परंतु पंडित नेहरूंच्यावर, त्यांच्या बंदिवासांतील जीवनाचा जवळजवळ कोणताच परिणाम झाला नाहीं – आणि याचें कारण त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्यें, कल्पकता, विचार आणि इच्छाशक्ति यांची एकात्मता झाली आहे हेंच होय. त्यांच्या इच्छाशक्तीला संचाराच्या आणि कृतीच्या रूपानें वाव मिळेनासा झाल्याबरोबर त्यांची कल्पकता, त्यांचें विचारात्मक आणि भावनात्मक जीवन तितकेंच सार्थ बनवते.

कलाकाराची संवेदनशीलता पंडित नेहरूंच्या सर्व राजकीय आचारविचारांमध्यें प्रकर्षानें व्यक्त होते. कलाकार हे लाजाळू आणि आत्मनिष्ठ असतात असेंच सर्वसाधारणपणें मानलें जातें. परंतु मानसिक उणीवा भरून काढण्याविषयींच्या एका विचित्र नियमानुसार आपले विचार आणि आपल्या भावना सुहृदांपुढें व्यक्त करण्याची त्यांना मनस्वी आवड असते. बाह्य जगाकडून मिळणाऱ्या प्रेरणांवर, त्यांची जी प्रतिक्रिया होते, ती शब्दरूपानें किंवा रंगरूपानें व्यक्त करण्यांत त्यांना सर्वसाधारण समाधान वाटतें, परंतु कांहींच्या बाबतींत ही प्रतिक्रिया इतकी तीव्र असते कीं केवळ तिच्या अभिव्यक्तीनें त्यांचें समाधान होत नाहीं. मग हे कलाकार राजकीय जीवनाच्या क्षेत्रांत उतरतात आणि ते ज्या वातावरणांत जन्माला आले तें वातावरणच बदलण्याचा प्रयत्न करतात. नंतर त्या कलाकाराचें राजकीय कार्यकर्त्यांमध्यें रूपांतर होतें. परंतु राजकीय लढ्यांत गुंतलेल्या कलाकाराचें मूळ स्वरूप कायमच राहतें. सार्वजनिक जीवनांत अवतर-

लेल्या सर्वांगपरिपूर्ण कलाकाराचें इतकें उत्कृष्ट उदाहरण श्री. जवाहरलाल नेहरूंच्याखेरीज इतिहासांत क्वचितच आढळेल.

कोणत्याहि क्षेत्रांतील थोरपणामध्यें परस्पर-विरोधाचा थोडासा अंश असतोच, परस्परविरोधी गुणांचें मिश्रण, असामान्य बुद्धिमन्तांचें व्यक्तिमत्त्व समृद्ध आणि अगम्य करतें. तेव्हां पंडित नेहरूंच्या ठिकाणीं शास्त्रीय दृष्टि कलात्मक मनोवृत्तीइतकीच प्रकर्षानें दिसून येते, यांत कांहींच आश्चर्य नाहीं. मानवाचा आणि मानवी व्यवहारांचा अभ्यास करतांना, विज्ञानाचा व्यक्तिनिरपेक्ष आणि वस्तुनिष्ठ दृष्टिकोण कायम राखण्याचा त्यांचा सतत प्रयत्न असतो. त्यांच्या शोधक, चिकित्सक आणि चौकस वृत्तीमुळें कोणत्याहि प्रश्नाचा एकतर्फी विचार करणें त्यांना सहसा शक्य होत नाहीं; आणि याचमुळें कोणतीहि कार्ययोजना आत्यंतिक टोकाला नेतांना ते कचरतात. परंतु त्यांच्या विचारांत, लेखनांत आणि कृतीमध्यें शंभर टक्के वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणाऱ्या व्यक्तीची व्यापक दृष्टि आणि समंजसपणा आढळून येतो.

काल क्षणभंगुर असून विनाश अपरिहार्य आहे ही कल्पना अखिल प्राणीमात्राच्या शोकान्तिकेची आपल्याला सतत जाणीव देते. हळुवार मनाला या जाणिवेपासून मुक्त राहणें अशक्य होतें. परंतु शूराचें मन मानवी प्रतिष्ठेचा सतत पुरस्कार करून दुःखावर आणि निराशेवर मात करतें. मरणाच्या खाईंतून जातांना पलीकडे दिसणाऱ्या उत्तुंग आणि उज्ज्वल शिखरांवरील आपली दृष्टि जो निश्चल राखतो तोच खरा नेता. सहनशीलता आणि धीरोदात्त वर्तन इत्यादि गुणांची जोपासना करणाऱ्या जीवनमूल्यांची जाणीव पंडित नेहरू आपल्याला करून देतात. मानवी प्रतिष्ठेची ही जाणीव त्यांच्या लेखनांत आणि कार्यांत पुरेपूर आढळून येते. याच रेशमी धाग्यांच्या बंधनांनीं त्यांना मौलाना आझादांशीं इतकें निगडित केलें आणि भारतीय संस्कृतीच्या व्यापक आणि मानवतावादीरूपांचें खरेंखुरें प्रतिनिधित्व प्राप्त करून दिलें.

विभिन्नतेंत एकता हें भारतीय संस्कृतीचें जर सार असेल तर अखिल जगालाही तें तितकेंच खरेंखुरें आणि अगत्याचें वाटण्याला कोणताच प्रत्यवाय नसावा. याच कारणांसाठीं पंडित नेहरूंच्या आजच्या आणि उद्याच्या भारताच्या स्वप्नाला जो एक विशेष अर्थ प्राप्त होतो तो, नवोदित राष्ट्राच्या समस्या सोडविण्यासाठीं त्यांनीं ज्यांना आवाहन केलें आहे त्या केवळ भारतीयांनाच नव्हे तर अखिल जगांतील सर्व संवेदनशील स्त्रीपुरुषांना प्रतीत होणें स्वाभाविक आहे.

आझाद स्मारक व्याख्यानमालेंतील पहिलें व्याख्यान देण्याची श्रीयुत जवाहरलाल यांना विनंति करतांना मला विशेष आनंद वाटतो.

नवी दिल्ली
ता २२ फेब्रुअरी १९५९

(हुमायूँ कबीर)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ
अनुक्रम ................. विः .........
क्रमांक ................. नों. दि. .........

१

सुरुवातीलाच मला आपली क्षमा मागणें जरूर आहे. सार्वजनिक कार्यांशीं माझा जरी दीर्घकाळ संबंध असला आणि अनेक वेळां सार्वजनिक सभांमध्यें मी जरी भाषणें करीत असलों तरी आज ज्या प्रकारच्या व्याख्यानाची माझ्या-कडून अपेक्षा केली जात आहे तशा प्रकारचें व्याख्यान देण्याची मला मुळींच संवय नाहीं. अशा प्रकारचें व्याख्यान विचार आणि विद्वत्तापरिपूर्ण असलें पाहिजे आणि तें तयार करण्यासाठीं पुष्कळ वेळही खर्च केला पाहिजे. अशा बाबतींत जरूर असणारा अनुभव मला नाहीं हें तर खरेंच. परंतु संसदेचें अंदाजपत्रकी अधिवेशन चालू असल्यामुळें आणि दैनंदिन कार्यासाठीं कमालीचा वेळ खर्चावा लागत असल्यामुळें अशा प्रसंगासाठीं जितकी तयारी करणें अगत्याचें असतें तितकी ती करणें मला अशक्य झालें.

मला सांगण्यांत आलेलें हें कार्य अंगीकारण्याला मी नाखूष होतों. परंतु दुर्बल मनानें मीं तें मान्य केलें. मौलाना आझादांच्या निधनाच्या आजच्या या वर्षदिनीं त्यांना श्रद्धांजलि वाहावी अशी माझी इच्छा होती. व्याख्यानासाठीं सुचवण्यांत आलेला विषयही मला आकर्षक वाटला. कारण कोणत्या ना कोणत्या तरी रूपानें भारताच्या वर्तमान आणि भविष्यकालांतील प्रश्नांनीं माझें मन व्यापून टाकलें आहे. त्याचबरोबर मला थोडी भीतीही वाटली. हा प्रश्न इतका महत्त्वाचा आहे आणि आजच्या भारताशीं माझे असलेले संबंध इतके निकटचे आहेत कीं त्यामुळें विकारवश न होतां विषयाचा विचार मला करतां येईल किंवा नाहीं याचीच मला शंका येऊं लागली. तेव्हां कामाचें ओझें आणि इतर परिस्थिति या गोष्टी लक्षांत घेऊन, मीं तयार केलेलें अशा प्रकारचें माझें हें पहिलेंच भाषण, श्रोते शांत मनानें ऐकून घेतील अशी मला आशा आहे.

आजचा भारत समजावून घेण्याचा आणि त्याचें वर्णन करण्याचा प्रयत्न करणें, हें फार कठिण काम आहे. उद्याच्या भारताविषयीं बोलणें तर जवळ–जवळ अविचाराचेंच ठरेल. जगांतील कोणत्याही देशाचें भवितव्य वर्तवण्याचें कार्य, जगाच्या इतिहासांत यापूर्वी कधींही इतकें कठिण झालेलें नसेल, भिन्न भिन्न घडामोडी इतक्या वेगानें घडून येत आहेत कीं त्यावर कोणाचा विश्वासही बसणार नाहीं आणि स्थित्यंतरें एकामागून एक सतत घडून येत आहेत. राज-कारणाच्या वरवरच्या रूपाखालीं असंख्य प्रवाह झाकले जातात आणि त्यामुळें

कांहीं वेळेला वस्तुस्थिति विद्रूप होऊन जाते आणि कांहीं वेळेला तिचें रूप आमूलाग्र बदलून जातें.

आजचा भारत हा केवळ आजकालच्या काळांतून नव्हे तर हजारों वर्षांच्या आपल्या देशाच्या दीर्घ इतिहासांतून निर्माण झाला आहे. आजची आमची जी कांहीं घडण आहे ती अनेकविध विचार–प्रवाह, अनुभव आणि कृति यांनीं झालेली आहे. भारतामध्यें माझ्या पिढींतील जे लोक आहेत त्यांची घडण विशेषेंकरून ज्या परिस्थितीमुळें आणि ज्या घडामोडींमुळें झाली ती तशीच पुन्हा कधींही घडून येण्याचा संभव नाहीं. आम्हांला ज्यानें खडबडून जागें केलें, आमच्या जीवनांत आमूलाग्र बदल घडवून आणला आणि ठराविक ठशाच्या जीवनक्रमामधून आम्हांला बाहेर काढलें असा महापुरुष आणि बलाढ्य नेता आम्हांला लाभला, इतकेंच नव्हें तर इतिहासांत महत्त्वपूर्ण म्हणून ज्यांची गणना होईल अशा घडामोडी आम्हीं पाहिल्या आणि त्यांमध्यें आम्हीं भागही घेतला. वातावरण तंग झाल्याचे आणि भावनांचा उद्रेक झाल्याचे अनेक प्रसंग आम्हीं अनुभवले आणि त्यांचीच प्रतिक्रिया म्हणून वैफल्याची आणि कधींकधीं नैराश्याची भावना आमच्या अनुभवाला आली. परंतु मानसिक ताण कमालीचा वाढल्यानंतर शरीर आणि मन खचल्याची जी भावना हमखास होते ती आमच्या मनाला कधींही शिवली नाहीं. ज्याचा नेहमी आधार वाटावा असा नेता आम्हांला लाभला होता. तो खडकासारखा–दीपस्तम्भासारखा होता–आणि आमच्या ठिकाणीं चैतन्य निर्माण करणारी, आमच्या सुप्तशक्ती आम्हांला पणाला लावायला लावणारी चळवळ आमच्या हातीं होती. ते क्षण नेहमीच कांहीं सुखावह नसत. कधींकधीं ते दुःख दायकही असत. परंतु आम्हीं महान् कार्य करण्यांत गुंतलों आहोंत आणि इतिहासाच्या पावलावर पाऊल टाकीत आम्ही आगेकूच करीत आहोंत अशी एक समाधानाची भावना आमच्या मनांत सदैव वसत असे. विचाराबरोबरच कृतीही घडून येत होती आणि त्यामुळें भरगच्च जीवनाची जाणीव होत होती. राजकीय क्षेत्रांतसुद्धां उच्च ध्येयें पुढें ठेवून एका नैतिक पातळीवर आम्ही कार्य करीत आहोंत या भावनेचा आम्हांला सर्वांत अधिक आधार वाटला. कोणत्याही लढ्यामध्यें विशेषतः राष्ट्रीय लढ्यामध्यें द्वेषाची जी भावना सर्वसाधारणपणें मनाला जाळून टाकते ती आम्हांला कधींही शिवली नाहीं.

गांधीजींची मूर्ति सदैव आमच्यासमोर होती, आमच्या मनींमानसीं भरून राहिली होती. शिवाय इतरही नरकेसरी आमच्यामध्यें होते आणि महान् कार्यांना स्वतःला वाहून घेतल्यामुळें आणि एका थोर नेत्याचें अनुयायित्व पत्करल्यामुळें ज्यांना मोठेपणा प्राप्त झाला होता अशा असंख्य स्त्रीपुरुषांचें साहचर्य आम्हांला

लाभलें होतें. त्या थोर वीरपुरुषांपैकींच वयानें तरुण परंतु ज्ञानवृद्ध आणि कसलेले म्हणून ज्यांना नेहमीं मान दिला जाई असे मौलाना आझाद हे एक होते. आमच्या चळवळीमध्यें त्यांना एक विशिष्ट स्थान होतें आणि जो संस्कृति-समन्वय साधण्यासाठीं भारताचे सतत प्रयत्न चालू आहेत त्या समन्वयाचे ते आम्हांला एकमेव प्रतीक वाटत असत. संकुचित राष्ट्रवादाच्या चाकोरींतून बाहेर पडण्याला त्यांनीं आम्हांला मदत केली आणि आमची दृष्टि विशाल केली. एक-मेकांपासून अनेक प्रकारें भिन्न असलेल्या या असंख्य लोकांना अत्यंत खंबीर अशा बंधनानें एकत्र आणलें आणि त्यांनीं आपल्या सबंध पिढीच्या कालावधींत एक-जुटीनें कार्य केलें हें एक आश्चर्यच आहे.

## २

भारत कसा आहे ? हाच प्रश्न माझ्या मनांत वारंवार आला आहे आणि भारताच्या गतेतिहासाचें आणि वर्तमान कालाचें अवलोकन करून त्याचें उत्तर शोधून काढण्याचा प्रयत्न मीं माझ्या अनभ्यस्त रीतीनें केला आहे. आपल्या प्राचीन इतिहासाचीं प्रारंभिक वर्णनें वाचल्यानंतर माझें मन आश्चर्यानें चकित होऊन गेलें. पौरुषानें आणि जोमानें रसरसलेल्या एका वंशाचा हा इतिहास होता. त्याच्या ठिकाणीं जिज्ञासा होती, अनिर्बंध संशोधनाची त्याला आंतरिक तळमळ होती आणि त्याच्या ज्ञात आणि प्राचीन कालावधींतसुद्धां प्रगल्भ आणि सहिष्णु संस्कृ-तीचा तो पुरावा देत होता. जीवनाचा आणि त्यांतील सुखदु:खांचा स्वीकार करून हा वंश अंतिम आणि विश्वव्यापी तत्त्वाचा सतत शोध करीत होता. संस्कृत या समृद्ध भाषेची त्यानें उभारणी केली आणि या भाषेच्या आणि आपल्या शिल्प कलेच्या आणि चित्रकलेच्या द्वारें त्यानें आपला जिवन्त संदेश दूरदूरच्या देशांना पोचवला. त्यानें उपनिषदें आणि गीता निर्माण केली; बुद्धाला जन्म दिला.

एकाद्या वंशाच्या किंवा जातीच्या इतिहासांत इतकी महत्त्वाची भूमिका, संस्कृतप्रमाणें जगांतील दुसऱ्या कोणत्याही भाषेनें क्वचितच बजावली असेल. संस्कृत भाषा ही सर्वोत्तम विचारांच्या आणि सर्वोत्कृष्ट वाङ्मयाच्या अभिव्यक्तीची साधन होती, इतकेंच नव्हे तर भारतामध्यें राजकीय भेदाभेद असतांनाही त्याची एकजूट साधण्याचें कार्य तिनें केलें. रामायण आणि महाभारत हे ग्रन्थ, हजारो वर्षें प्रत्येक पिढींतील लक्षावधि लोकांच्या जीवनाचे भाग बनले आहेत. आम्ही

भारतीय वंशाचे लोक, बुद्धाला, उपनिषदांना आणि रामायण-महाभारत यांसारख्या ग्रन्थांना विसरलों तर आमच्याजवळ शिल्लक काय राहील, असा प्रश्न माझ्यापुढें सदैव उभा राहतो. तसें झालें तर आपला हा वंश निराधार बनून जाईल आणि या प्रदीर्घ कालावधीमध्यें ज्या मूलभूत गुणांनीं आपल्याला वैशिष्टय प्राप्त करून दिलें ते गुणही नाहींसे होतील आणि मग भारत हा भारत राहणार नाहीं.

३

हळुहळू अवनतीला सुरुवात झाली, विचारांचा ताजेपणा नाहींसा झाला; तो शिळा झाला, तारुण्याचा जोम आणि उन्माद नाहींसा होऊन त्या ठिकाणीं दुर्बल वार्धक्य आलें. साहसी वृत्ति नाहींशी होऊन निर्जीव साचेबंद जीवनाला सुरुवात झाली आणि अखिल जगाचें विशाल आणि खळबळजनक स्वप्न, जातिभेद, संकुचित सामाजिक चालीरीती आणि समारंभ या सर्वांमध्यें विरून गेलें. तरीसुद्धां भारतांतील अफाट जनसागरामध्यें बाहेरून वारंवार येऊन मिसळलेल्या अनेकविध वंशांच्या लोकांना आत्मसात् करण्याचें सामर्थ्य भारतामध्यें होतें—आणि तारुण्याच्या ऐन जोमामध्यें ज्या विचारांनीं भारताला कार्यप्रवृत्त केलें होतें त्यांचा त्याला कधींही विसर पडला नव्हता.

त्यानंतर आलेल्या इस्लाम धर्माचा आणि मुसलमानांच्या स्वाऱ्यांचा भारतावर फार मोठा परिणाम झाला. त्यांच्या पाठोपाठ पाश्चात्य वसाहतशाही राष्ट्रें आलीं. त्यांनीं एक नव्याच प्रकारचें वर्चस्व सुरू केलें; एका नव्या वसाहतशाहीचा अंमल सुरू केला आणि त्याचबरोबर युरोपमध्यें वाढीला लागलेल्या औद्योगिक संस्कृतीचा आणि नव्या कल्पनांचा भारतावर पगडा बसवला. या कालावधीचा शेवट, दीर्घकाळ चाललेल्या लढ्यानंतर स्वातंत्र्यप्राप्तीमध्यें झाला. आतां गतकाळांतील या जबादाऱ्यांच्या जाणिवेचें ओझें मनात बाळगून आम्हीं मनांत चित्रित केलेल्या अर्धवट स्वप्नांना आणि भावी काळाच्या प्रेरणांना मूर्तस्वरूप करण्याचा आज आम्ही प्रयत्न करीत आहोंत. हीं सर्व युगें आमच्यामध्यें आणि आमच्या देशामध्यें आज प्रतिबिम्बित झालीं आहेत. संघटित शक्ति आणि जोम हीं नव्या युगाचीं प्रतीकें आहेत. आमच्या देशांत अणु-विज्ञानाचा आणि परमाणु शक्तीचा विकास घडून येत आहे आणि त्याचबरोबर गोमयाचें माहात्म्य आम्ही अद्यापही मानीत आहोंत. अशा रीतीनें प्रत्येक शतकाचें प्रतिबिम्ब

या देशांत दिसत असून त्याशिवाय त्यामध्यें विपुल विविधताही आहे. या विविधतेच्या मुळाशीं एकता आहे. कितीही दुर्दैवाचे आणि विनाशाचे प्रसंग आमच्यावर ओढवले तरीही या एकतेनेंच आम्हां भारतीयांना युगानुयुगें संघटित ठेवलें. विज्ञानाच्या आणि तंत्रज्ञानाच्या जगामध्यें आम्ही उडी घेत आहोत. निसर्गशक्तींवर अधिकाधिक ताबा मिळवितां येईल अशा रीतीनें आमचें ज्ञान सुसंघटित करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोंत. परंतु केवळ आमचें दारिद्र्य आणि आमचा अपुरा विकास यांमुळेंच नव्हे तर कांहीं परंपरागत कल्पनांचा आणि चालीरीतींचा आमच्या मार्गांत व्यत्यय येत आहे. त्याचबरोबर आम्ही आमच्या भूतकालाची उपेक्षा केली तर आमचा भविष्यकाळ पोकळ आणि अर्थशून्य राहील हेंही तितकेंच खरें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप
अनुक्रम वि
क्रमांक नों. दि.

४

मति कुंठित करून टाकील असा आमचा हा वर्तमानकाल आहे. भविष्याकडे आमची दृष्टि लागली आहे आणि भूतकालालाही आम्ही विसरूं शकत नाहीं. भूत-भविष्याच्या रस्सी-खेचींत आम्ही सांपडलों आहोंत. हा संघर्ष कसा सोडवायचा आणि आमच्या आधिभौतिक गरजा भागवणारा परंतु त्याबरोबर आमची आध्यात्मिक धारणा कायम राखणारा जीवनमार्ग कसा शोधून काढायचा हाच आमच्या पुढें प्रश्न आहे. कोणतीं नवीं ध्येयें किंवा नव्या जगाला अनुरूप होतील अशा रीतीनें फेरबदल करून कोणतीं जुनीं ध्येयें आम्हांला जनतेपुढें ठेवतां येतील आणि जनतेला कशा रीतीनें जागृत आणि कार्यप्रवृत्त करणें आम्हांला शक्य होईल हा प्रश्न आमच्या पुढें आहे.

भारताचे विशेष असे प्रश्न आमच्या पुढे आहेतच. जगापुढें असलेल्या महत्त्वपूर्ण प्रश्नांच्या जबाबदारीचा आमचा वांटा आम्हांला उचलावयाचा आहे. आजच्या या जगानें कितीही अमर्याद प्रगति केलेली असली तरी त्याची आत्मश्रद्धा नाहींशी होत चालली आहे असेंच दिसून येत आहे. या घडीला भारतामध्यें आर्थिक प्रगति घडवून आणण्याच्या आणि पंचवर्षीय योजना पार पाडण्याच्या कार्यांत आम्ही गढून गेलों आहोंत हें स्वाभाविकच आहे. लोकांचें राहणीचें मान वाढवण्यासाठीं आमचे आटोकाट प्रयत्न चालू आहेत. कोणत्याही प्रकारच्या प्रगतीसाठीं हें सर्व प्रथम घडून येणें अत्यावश्यक आहे. परंतु आम्ही जें कांहीं

करीत आहोंत तेवढेंच पुरेसें आहे कीं त्यांत आणखी कशाची तरी भर घालणें आवश्यक आहे अशी शंका मनाला येऊं लागते. लोककल्याणकारी राज्याचें ध्येय यथायोग्यच आहे. परंतु तें कदाचित् नीरसही वाटण्याचा संभव आहे. ज्या देशांनीं हें ध्येय साध्य करून घेतलें, त्यांच्यापुढें जे नवे प्रश्न आणि ज्या नव्या समस्या निर्माण झाल्या, त्या केवळ भौतिक प्रगतीनें किंवा यांत्रिक सुधारणेनें सुटूं शकत नाहींत असेंच आढळून आलें आहे. मानवी स्वभावांतील कांहीं उणीवा भरून काढण्याची महत्त्वाची कामगिरी धर्मानें बजावली आहे. परंतु त्या प्रकारच्या धर्माची पकड आतां सैल झाली असून विज्ञानानें आणि बुद्धिवादानें दिलेलें आव्हान स्वीकारण्यास तो आतां असमर्थ झाला आहे. धर्माची गरज असो वा नसो आपल्या जीवनाला सार्थकता आणण्यासाठीं आणि आपल्याला एकत्र ठेवण्यासाठीं एकाद्या योग्य अशा ध्येयावर आपली श्रद्धा असणें अगत्याचें आहे. आपल्या दैनंदिन जीवनाच्या गरजा भांगवण्याव्यतिरिक्त आणखी कांहीं तरी उद्दिष्ट आपल्याला साध्य करावयाचें आहे ही जाणीव आपल्याला सतत असली पाहिजे.

समाजवादानें आणि साम्यवादानें उद्दिष्टाची ही जाणीव आपल्याला देण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु त्यांची प्रवृत्ति हटवादाकडे झुकत आहे. साम्यवादी हे वर्तमानकालाचे तात्त्विक सिद्धान्तवादी झाले आहेत.

प्रत्येक समाज समतोलपणा साध्य करण्याचा प्रयत्न करीत असतो. कांहीं वेळेला हा प्रयत्न संघर्षाच्या मार्गांनीं केला जातो तर कांहीं वेळेला तो, एकवाक्यता साध्य करण्याच्या सहेतुक वा निर्हेतुक मार्गांनीं केला जातो. रानटी अवस्थेंतील समाजांत फारसा बदल घडून येत नाहीं. त्यामुळें त्यांचें जीवन साचेबंद होतें आणि त्याला जो समतोलपणा प्राप्त होतो तो निकृष्ट प्रतीचा असतो. गतिमान् समाज, वैयक्तिक आणि सामाजिक जीवनांत अनेक तेढी निर्माण करतो. आणि हें जर खरें असेल तर आज जगांत असलेल्या तेढीच्या भावना प्रचंड गतिमानता दर्शविणाऱ्या आहेत. अभिनव समतोलपणा आणि मानवी जीवनाच्या नव्या परिसीमा गांठण्याच्या प्रयत्नांच्या त्या द्योतक आहेत. अणु–युगांतील शस्त्रास्त्रें, अखिल मानवजातीचा सर्वसंहार करण्याचा संभव आहे, ही भीति जर आमच्या मनांत सदैव वसत नसती तर आजच्या जगांतील गति–मानता आम्हांला स्फूर्तिदायीच वाटली असती. आम्ही भविष्याकडे दृष्टि ठेवून कांहीं तरी साध्य करून घेण्याच्या हेतूनें, श्रद्धेनें आणि जोमानें कार्य केलें पाहिजे. त्याचबरोबर गतकालानें दिलेला वारसा आम्हीं कायम राखला पाहिजे आणि त्यावरच आमची धारणा झाली पाहिजे. बदल आवश्यक आहे, परंतु सातत्यहि तितकेंच अगत्याचें आहे. भूतकालांत आणि वर्तमानकालांत जो पाया घातला गेला असेल त्यावरच भविष्याची उभारणी होत असते. गतकाळाशीं

असलेले आमचे संबंध आम्हीं साफ तोडून टाकले तर त्यांत रुजलेलीं आमचीं पाळेंमुळेंच आम्हीं उखडून टाकल्यासारखें होईल आणि आमचा जीवनवृक्ष नीरस होईल, वठून जाईल. भारतीयांच्या आणि भारतभूच्या समृद्ध परंपरांचा पायाभूत आधार, गांधीजींनीं कायम राखला आणि त्याचबरोबर क्रांतिकारी पातळीवर कार्य केलें हेंच त्यांचें वैशिष्टच आहे. गांधीजींनीं जुनाट आर्थिक सिद्धान्तांचा अंगिकार केला आहे. कांहीं तरी जुनाट परंपरांचा ते पुरस्कार करीत आहेत किंवा ते प्रतिगामी प्रवृत्तींना प्रोत्साहन देत आहेत असें म्हणून पुष्कळांनीं त्यांच्यावर टीका केली. परंतु त्यांच्या अफाट कार्यविस्ताराचें परि–शीलन करणाऱ्याला त्या कार्याच्या क्रांतिकारी परिणामांची जाणीव झाल्या–शिवाय रहात नाहीं. हे परिणाम राजकीय किंवा सामाजिक क्षेत्रांत जरी दिसत असले तरी त्यांची जाणीव होण्याच्या कामीं आम्हांला थोडी अडचण पडते. कारण संघर्षाच्या पाश्चात्य परंपरेंत आम्ही वाढलों आहोंत. खरी क्रांति, पुढा–ऱ्यांकडून नव्हे तर लोकांच्याकरवींच घडून येते आणि तिचें स्वरूप अवश्यमेव सामाजिक असतें हें गांधीजींना माहीत होतें. गांधीजींच्या पूर्वीं अनेक विख्यात समाजसुधारक होऊन गेले आणि कांहीं किरकोळ बदल घडवून आणण्याच्या कामीं किंवा एकादा नवा संप्रदाय निर्माण करण्याच्या कामीं ते यशस्वीहि झाले. परंतु रामराज्याचा पुरस्कार करून गांधीजींनीं, काय घडत आहे याची कोणालाहि पुरेपूर जाणीव होण्यापूर्वींच क्रांतीचें लोण लक्षावधि लोकांच्या घरो-घर पोंचवलें. गांधीजींनीं जातिव्यवस्थेचा धिःकार आपल्या आयुष्याच्या शेवटीं शेवटीं जरी थोडचाफार अंशांनीं केला असला तरी एकंदर व्यवस्थेचा धिःकार त्यांनीं क्वचितच केला. परंतु दलित वर्गांच्या आणि हरिजनांच्या उन्नतीचा सतत पुरस्कार करून त्यांनीं जातिभेदांवर आधारलेल्या एकंदर समाजव्यवस्थेच्या मुळाशींच घाव घातला. त्यांनीं ही गोष्ट हेतुपुरःसर केली. तिच्या परिणामांची त्यांना पूर्ण जाणीव होती. राजकीय कार्यक्रमाच्या आपल्या तंत्रानें त्यांनीं लक्षा-वधि लोकांच्या ठिकाणीं नवा जोम निर्माण केला, त्यांची भीति नाहींशी केली आणि स्वाभिमान आणि स्वावलंबन हे गुण त्यांच्या ठिकाणीं निर्माण केले. उपेक्षितांच्या आणि दारिद्र्यपीडितांच्या उन्नतीचा आग्रह धरून गांधीजींनीं आम्हां सर्वांना सामाजिक न्यायाच्या दृष्टीनें विचार करायला लावलें. शांतपणानें, निर्विकार मनानें आणि शक्य तों संघर्षाची भावना निर्माण होऊं न देतां त्यांनीं हें सर्व केलें. सत्यावर आणि शांततामय मार्गावर त्यानीं सर्वांत अधिक भर दिला. किंबहुना सत्य हाच त्यांच्या जीवनाचा आधार होता आणि त्यांचें स्फूर्ति-दायी कार्य सत्याशीं सदैव संलग्न होतें. हें कार्य करतांना त्यांनीं आमचा भूत-ालक ज्या मूलभूत तत्त्वांनीं समृद्ध केला होता त्या तत्त्वांची आम्हांला जाणीव

करून दिली. अशा रीतीनें त्यांनीं आपल्या कार्याची उभारणी जुन्या पायावरच केली, परंतु भविष्याच्या दृष्टीनें त्याला योग्य तें वळण दिलें. त्यांचे कांहीं आर्थिक किंवा इतर सिद्धान्त आधुनिक कल्पनांशीं जुळत नव्हते किंवा त्यांना कांहीं तात्पुरतेंच महत्त्व होतें म्हणून ते कधीं बेचैन झाले नाहींत. पाया भर-भक्कम असेल तर बदलत्या काळाशीं जुळतें घेण्याची त्यांची केव्हांही तयारी होती.

भूतकालाची वर्तमानकाळाशीं आणि भविष्याशींही सांगड घालण्याची त्यांची कला मला नेहमींच कौतुकास्पद वाटत असे–आणि हें त्यांना करतां आलें म्हणूनच ते आम्हांला सतत प्रगतीच्या मार्गावर नेऊं शकले आणि पुष्कळ अंशीं संघर्षही टाळूं शकले. त्यांनीं आम्हांला जो एक महत्त्वाचा धडा शिकवला, जो आमच्या मनावर बिम्बवला तो, साधनांचें महत्त्व हाच होय. साध्य हेंच कांहीं सर्वस्व आहे असें ते मानीत नसत. साध्याचें स्वरूप साधनांच्यावर अवलंबून असतें असेंच त्यांचें म्हणणें असे. या तत्त्वामध्यें आणि त्यांच्या कार्यपद्धतीमध्यें जर कांहीं मूलभूत सत्य असेल तर त्यांनीं घालून दिलेल्या पायावरच आपल्याला आपल्या कार्याची उभारणी करावी लागेल. याचा अर्थ असा नाहीं कीं गांधीजींनीं कधींकाळीं अनुरूप म्हणून जें कांहीं सांगितलें किंवा केलें तें आज अनुरूप नसतांना आपण त्यांचें अन्धानुकरण केलें पाहिजे. बदलत्या काळाशीं आपल्यालाही जुळतें घेणें आवश्यक आहे. परंतु मूलभूत तत्त्वें हींच आपलीं नेहमींचीं मार्गदशक तत्त्वें असलीं पाहिजेत.

## ५

इस्लाम धर्मानें भारतावर आपलें राजकीय वर्चस्व बसवलें आणि तिथून संघर्षाला सुरुवात झाली. त्याचे परिणाम दुहेरी स्वरूपाचे होते. त्यायोगें हिंदु समाजाच्या संकुचित वृत्तीला एकपरीनें प्रोत्साहन दिलें तर दुसऱ्या परीनें नवें वातावरण आणि नवे विचार निर्माण करून एक प्रकारचें नवजीवन निर्माण केलें. हिंदु समाजव्यवस्था पराङ्मुख बनली होती. परंतु भारतीय विचारसरणीं-तूनच निर्माण झालेला बौद्धधर्म या बाबतींत वेगळा होता. बाहेरून आलेल्या मुसलमानांची सामाजिक आणि धार्मिक पद्धतिसुद्धां परकीय विचारांना अशीच विन्मुख होती. अशा रीतीनें पराङ्मुख अशा दोन पद्धति एकत्र आल्या. त्यांपैकीं

कोणीही कोणाचें निर्मूलन करण्याला किंवा एक दुसरीवर आपलें वर्चस्व बसवण्याला समर्थ नव्हती. मुसलमानांनीं राजकीय विजय मिळवला तरी बौद्धिक, नैतिक किंवा धार्मिक विजय त्यांना मिळवतां आला नाहीं. जुनी भारतीय परम्परा आणि श्रद्धा, नव्या वर्चस्वाचा प्रतिकार करण्याइतकी अजूनही समर्थ आणि खंबीर होती. मुसलमान आपलें प्रभावी व्यक्तिमत्त्व घेऊन आले परंतु त्यांच्या पूर्वीं आलेल्या परकीयांना भारतानें जसें आत्मसात् केलें तसें मुसलमानांना तो करूं शकला नाहीं. तसेंच भारतीय जनतेंचें मूलभूत व्यक्तिमत्त्वही मुसलमान बदलूं शकले नाहींत. तेव्हां आपआपल्या परीनें खंबीर पायावर उभारल्या गेलेल्या या दोन्ही पराङ्मुख समाजांचे परस्परसंबंध हितकारक रीतीनें कसे वृद्धिंगत करतां येतील हाच मध्ययुगीन भारतापुढें फार मोठा प्रश्न होता. त्या दोघांच्या मध्यें कोणत्यातरी प्रकारचा सलोखा निर्माण करणें हाच उज्ज्वल भविष्याच्या आशेचा एकमेव मार्ग आहे ही जाणीव अकबराला आणि त्याच्यासारख्या इतर सुज्ञ राज्यकर्त्यांना झाली होती.

जुन्या हिंदूंचें तत्त्वज्ञान आणि त्यांची जागतिक दृष्टि कमालीची सहिष्णु होती. आणि तरीसुद्धां जातिभेदांचा आणि उच्चनीच वर्णव्यवस्थेचा अवलंब करून त्यांनीं आपल्या समाजांत असंख्य भेदाभेद निर्माण केले होते. इतरांना आपल्याबरोबरीचे लेखून कसें राहायचें हा नवाच प्रश्न मुसलमानांच्या पुढें उभा ठाकला होता. इतर देशांत जेथें जेथें ते गेले तेथें तेथें त्यांनीं संपादन केलेला विजय इतका मोठा होता कीं त्यांच्या पुढें हा प्रश्नच निर्माण झाला नाहीं. ख्रिश्चन जगाशीं त्यांचा संघर्ष निर्माण झाला. आणि शकडों वर्षांनंतरही त्यांना तो प्रश्न सोडवतां आला नाहीं. भारतामध्यें हळूहळू समन्वय साधला जात होता परंतु ही क्रिया पूर्ण होण्यापूर्वींच इतर कांहीं अडचणी आल्या. औद्योगिक प्रगतिपथावर असलेलीं पाश्चात्त्य राष्ट्रें बलाढ्य होतीं. इतरांहून आपण खासच श्रेष्ठ आहोंत या भावनेनें तीं इतरांपासून आलिप्त रहात होतीं आणि ज्यांच्यावर तीं राज्य करीत होतीं त्यांना तीं तुच्छ लेखीत होतीं. त्यांच्या मध्यें आणि भारतीयांच्या मध्यें जितकें महदंतर होतें तितकें तें हिंदु आणि मुसलमान यांच्या मध्यें कधींही नव्हतें.

प्रथमच भारतावर वसाहतशाही अंमल सुरू झाला. दूरवर असलेला एक देश भारतावर सत्ता गाजवूं लागला. त्यापूर्वीं भारतावर ज्यांनीं आक्रमण केलें आणि भारताला जिंकलें त्यांनीं भारतालाच स्वदेशाप्रमाणें मानलें. त्यांची निष्ठा इतरत्र कुठेंही नव्हती. ते खऱ्या अर्थानें भारतीय बनले. परंतु आतां आलेलें आक्रमण वेगळयाच स्वरूपाचें होतें. हे पाश्चात्य आक्रमक भारताशीं एकरूप

होणें अशक्य होतें. त्यांच्यामध्यें आणि या देशांतील हिंदु, मुसलमान किंवा इतरजण यांच्यामध्यें दुर्लंघ्य असें अंतर होतें.

अशा स्थितींतही पाश्चात्यांच्या नव्या व्यापक विचारसरणीचा आणि औद्योगिक प्रगतीचा भारतीय मनावर आणि जीवनावर परिणाम होऊं लागला. नवा राष्ट्रवाद वाढीला लागला. वसाहतशाहीला त्याचा स्वाभाविकच विरोध होता — आणि स्वातंत्र्यसंपादनासाठीं त्याची धडपड चालूं झाली होती. त्याचबरोबर पाश्चात्त्यांची नवी औद्योगिक संस्कृति, भाषा, त्यांचें वाङ्मय आणि त्यांचे मार्ग यांचाही भारतीयांच्यावर अधिकाधिक परिणाम होत होता. अर्थात हा परिणाम बहुतांशीं समाजाच्या वरच्या थरापुरताच मर्यादित होता. बहुजन समाज दारिद्र्यांतच बुडून गेला होता.

राम मोहन रॉय आले आणि त्यांनीं प्राचीन आणि अर्वाचीन भारताच्या विचारप्रवाहांचा कांहींसा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला विवेकानंदांनीं जुन्या भारतीय विचारांचा कांहींसा जोम पुन्हां निर्माण केला. आणि त्याला नव्या विचाराचें वळण लावलें. राजकीय आणि सांस्कृतिक चळवळी वृद्धिंगत झाल्या आणि गांधीजींच्या आणि रवींद्रनाथ टागोरांच्या विचारसरणीमध्यें त्याची परिणति झाली.

युरोपमध्यें विज्ञान आणि परंपरागत धर्म यांच्यामध्यें भीषण संघर्ष चालूं होता. ख्रिश्चन धर्माला अभिप्रेत असलेली विश्वव्यवस्था, वैज्ञानिक सिद्धांताशीं मुळींच जुळत नव्हती. विज्ञानामुळें संघर्षाची ही भावना भारतांत निर्माण झाली नाहीं आणि आपल्या मूलभूत कल्पनांना यत्किंचितही बाध येऊं न देतां भारतीय तत्त्वज्ञान, विज्ञानाचे सिद्धान्त सहज स्वीकारूं शकले.

राष्ट्रवादाचा विकास आणि सामाजिक न्यायाची तळमळ या दोन शक्ति इतर ठिकाणांप्रमाणेंच भारतामध्येंही वाढीला लागल्या. समाजसत्तावाद आणि मार्क्सवाद हे या सामाजिक न्यायाच्या तळमळीचे प्रतीक बनले. त्यांच्यामध्यें ग्रथित झालेल्या वैज्ञानिक विचारसरणीव्यतिरिक्त त्यांनीं बहुजनसमाजाच्या भावनांवर मनस्वी परिणाम केला. पश्चिम युरोपमध्यें औद्योगीकरणाच्या प्रारंभीच्या दिवसांत जी भयानक परिस्थिति वसत होती तिनेंच मार्क्सला प्रथम बेचैन केलें. त्या वेळीं खरीखुरी लोकशाही राज्यघटना अस्तित्वांत नव्हती आणि सनदशीर मार्गांनीं कोणतेही बदल घडवून आणणें जवळजवळ अशक्य होतें. त्यामुळें क्रांतिकारी अत्याचार, हाच बदल घडवून आणण्याचा एकमेव मार्ग त्या वेळीं उपलब्ध होता. याच कारणांसाठीं मार्क्सवाद अत्याचारी क्रांतीशिवाय दुसऱ्या कशाचाच विचार करूं शकत नव्हता. युरोपच्या परंपरेलाही तें अनुसरूनच होतें. परंतु त्या वेळेपासूनच राजकीय लोकशाहीचा प्रसार होऊं लागला

आणि शांततामय बदल घडून येण्याची शक्यता निर्माण झाली. तेव्हांपासूनच प्रचंड अशी वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रगति घडून आली आणि भौतिक उन्नति सर्वांनाच सुलभ वाटूं लागली. भांडवलशाहीचें मूलभूत स्वरूप अद्यापही जरी कायम असलें आणि मक्तेदारीकडे आणि आर्थिक सत्ता केंद्रित करण्याकडे तिचा जरी कल असला तरी खुद्द भांडवलशाहीमध्येंच आज अनेक बदल घडून आले आहेत. लोकशाही राज्यघटनेनें कामगारांची संघटना घडवून आणली. परंतु त्याहीपेक्षां सामाजिक न्यायाविषयींच्या तळमळीनें आणि वैज्ञानिक आणि तंत्रशास्त्रविषयक प्रगतीनें हें परिवर्तन घडवून आणलें. आज भांडवलशाही राष्ट्रांनीं आपल्या लोकांना भौतिक राहणीचा उच्च दर्जा प्राप्त करून दिला आहे हें आपण पाहतोंच आहोंत.

सोव्हियट यूनिअनमध्येंही भौतिक सुस्थिति आणि वैज्ञानिक आणि तंत्रशास्त्रविषयक प्रगति, तुलनात्मक दृष्टीनें फार थोडचा कालावधींत परंतु अतिशय प्रचंड प्रमाणांत साध्य करण्यांत आली असल्याचेंही आपल्याला दिसत आहे. हें सर्व केवळ अत्याचारी मार्गांनीं घडवून आणलें गेलें आहे हें म्हणणें चुकीचें ठरेल. इतर पद्धतींतही भरपूर अत्याचार झाले आहेत. परंतु सोव्हियट यूनिअनमध्यें उन्नति घडवून आणतांना कांहीं विशिष्ट परिस्थितीमुळें पुष्कळसे अत्याचार केले गेले आणि पुष्कळ प्राणांचें विसर्जन केलें गेलें हें खरें आहे असें मला वाटतें. ह्या अत्याचारांचा जास्तींत जास्त निषेध खुद्द सोव्हियट यूनिअनच्याच थोर पुढाऱ्यांनीं केलेला आहे.

## ६

पाश्चात्य राष्ट्रें आणि साम्यवादी राष्ट्रें यांच्यामधील संघर्ष आणि विशेषत: अमेरिका आणि सोव्हियट यूनिअन यांच्यामधील स्पर्धा यांचेंच दडपण आजच्या आंतर्राष्ट्रीय घडामोडींवर आहे. या दोन राष्ट्रांमध्यें स्पष्ट अशी भिन्नता जरी दिसत असली तरी त्यांच्यामधील साधर्म्य पाहून कोणालाही आश्चर्यच वाटेल. त्या दोघांनीं अति उच्च प्रतीची औद्योगिक आणि यांत्रिक सुधारणा साध्य करून घेतली आहे. यंत्राच्या सतत वाढत्या शक्तीवर आणि मानवी प्रश्न सोडवण्याच्या त्यांच्या कार्यक्षमतेवर त्यांचा विश्वास आहे. दोन्ही देशांतील जनता स्नेहपूर्ण, आतिथ्यशील आणि शांतताप्रिय आहे. आज खरा भेद जर कुणा-

मध्यें असेल तर तो विकसित राष्ट्रें आणि ज्यांचा अद्याप पूर्ण विकास झालेला नाहीं अशा राष्ट्रांच्या मध्यच आहे. या अविकसित राष्ट्रांना अशी जाणीव झाली आहे कीं केवळ वैज्ञानिक आणि औद्योगिक उन्नतीनेंच त्यांना हरएक प्रकारची प्रगति करून घेतां येईल आणि त्यांच्या असामान्य भौतिक हाल अपेष्टा त्यांना दूर करतां येतील. त्याच दिशेनें त्यांचे प्रयत्न चालू आहेत. त्यांना कमी अधिक यश येत असलें तरी हें कार्य फार बिकट आहे याची त्यांना जाणीव आहे. युरोपमध्यें खरी राजकीय क्रांति घडून येण्याच्या आधीं आर्थिक क्रांति घडून आली होती. त्यामुळें राजकीय क्रांतीच्या पूर्वींच आर्थिक बदलांनीं कांहीं साधन-संपत्ति निर्माण करून ठेवली होती. आशियामध्यें राजकीय क्रांति प्रथम आली आणि तिच्या पाठोपाठ सामाजिक उन्नतीची निकड निर्माण झाली. परंतु ही निकड, आर्थिक मागासलेपणा आणि साधनसंपत्तीचा अभाव यांमुळें सहजा-सहजीं भागवणें शक्यच नव्हतें. ज्यांचा पूर्ण विकास झालेला नाहीं अशा राष्ट्रांचे प्रश्न, औद्योगिक दृष्टचा पुढारलेल्या आणि ज्यांनीं मोठचा प्रमाणावर उत्पादन करण्याची व्यवस्था केली आहे अशा राष्ट्रांच्यापेक्षां भिन्न आहेत. युरोप आणि अमेरिका यांचें औद्योगीकरण घडवून आणणाऱ्या प्रदीर्घ प्रक्रियेचा अवलंब करणें, या अविकसित देशांना शक्य नाहीं हें उघड आहे. लोकांच्या आशा-आकांक्षा तृप्त करण्यासाठीं त्यांना कांहीं तरी भरीव असें दिलें नाहीं तर राजकीय घटनाच उध्वस्त केली जाईल अशा प्रकारचें सामाजिक दडपण कायमचें निर्माण होतें. त्याशिवाय झपाटचानें वाढणाऱ्या लोकसंख्येचें दडपणही आहेच. या वाढत्या लोकसंख्येमुळें उत्पादन कितीही वाढलें तरी तें अपुरेंच पडतें — आणि आणखी प्रगति घडवून आणण्यासाठीं भांडवल म्हणून कांहींही बचत करण्याची शक्यताच रहात नाहीं. तेव्हां एकाद्या अविकसित आणि दारिद्र्यपीडित देशामध्यें भांडवलउभारणीसाठीं जास्त उत्पादन कसें करतां येईल हाच मूलभूत प्रश्न उत्पन्न होतो. या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठीं कोणताही प्रयत्न करायचा झाला तर त्याचा आणखी भार बहुजनसमाजावर स्वाभाविकच पडतो. परंतु अशा स्थितींतही, आपल्यावर आहे तो भारही कमी करावा अशी या बहुजनसमाजाची मागणी असते.

अशा परिस्थितींत जबरदस्तीच्या मार्गांचा अवलंब करणें शक्य असतें. परंतु भावी काळाविषयीं आशेला कांहीं तरी जागा असल्याशिवाय जबरदस्तीचे मार्गसुद्धां फारसे उपयोगी पडत नाहींत असें विचारान्तीं आढळून येतें. तेव्हां कांहीं झालें तरी अधिक नेटाचे प्रयत्न होण्यासाठीं कोणत्यातरी प्रकारचें प्रोत्सा-हन देण्याची व्यवस्था करणें आणि भावी काळाची लोकांना ज्यायोगें आशा वाटेल असें व्यवहार्य उद्दिष्ट लोकांच्यापुढें ठेवणें फार अगत्याचें असतें. हा भावी

काळही फार दूरचा असून भागणार नाहीं. लोकशाही समाजामध्यें, लोकांना प्रोत्साहन देऊन, त्यांच्या आशेला वाव देऊन आणि त्यांची स्थिति क्रमाक्रमानें सुधारून, नेटाचे प्रयत्न करण्याला त्यांना उद्युक्त करण्याची कितपत शक्ति आहे यावरच सर्व कांहीं अवलंबून असतें.

ज्या देशांचा पूर्ण विकास घडून आलेला नाहीं अशांपैकीं बहुतेक देशांपेक्षां भारत अधिक पुढारलेला आहे. औद्योगीकरण, शेतीसुधारणा, शैक्षणिक प्रगति आणि आरोग्यसुधारणा, या क्षेत्रांत पाया घालण्याच्या कामीं, भारतानें गेल्या कांहीं वर्षांत निश्चित प्रगति केली आहे. परंतु त्याहीपेक्षां भारताला स्वातंत्र्याची प्राप्ति करून देणाऱ्या राष्ट्रीय चळवळीनें जीं ध्येयें आणि उद्दिष्टें आमच्यापुढें ठेवलीं आणि जी शिस्त आमच्या अंगीं बाणवली ती आम्हांला अधिक महत्त्वाची आहे.

राष्ट्रवाद ही अजूनही आशियांतील सर्वांत अधिक प्रभावी शक्ति आहे. राष्ट्रवादाची आशियामध्यें वाढ व्हावी हें स्वाभाविकच आहे. परंतु युरोपमध्येंसुद्धां राष्ट्रवाद अधिकाधिक प्रत्ययाला येत आहे. फॅसिझम् आणि नाझीझम् यांची जोड मिळाल्यामुळें हा राष्ट्रवाद भयानक झाला होता. या संकटाचें निवारण केलें गेलें असलें तरी सौम्य स्वरूपाच्या परंतु एका आक्रमक राष्ट्रवादाचें वर्चस्व कित्येक देशांच्या धोरणावर अजूनही दिसून येत आहे. युरोपमधील कित्येक देशांमध्यें ही वस्तुस्थिति कमीअधिक प्रमाणांत स्पष्ट दिसून येते. या राष्ट्रवादाबरोबरच त्याच्याविरुद्ध असलेली अति-राष्ट्रीय ऐक्याची प्रवृत्ति युरोपमध्यें अस्तित्वांत असल्याचें दिसून येत आहे. सामायिक बाजारपेठा आणि इतर अनेक सामायिक संस्था निर्माण करण्याच्या प्रयत्नांनीं ती अभिव्यक्त होत आहे.

साम्यवादी देशांमध्येंही राष्ट्रवादाचा स्पष्ट पुरावा सांपडतो. मार्क्सवादी कल्पनांनीं आणि त्याच्या अनुषंगिक असलेल्या इतर अनेक कल्पनांनीं फार प्रभावित झालेल्या सोव्हियट यूनिअनमध्येंही कडव्या राष्ट्रवादाची चमक दिसून येते. पूर्व युरोपमधील इतर देशांमध्यें राष्ट्रवादाचा प्रभाव अगदीं उघड उघड असाच आहे. चीनमध्येंहि साम्यवाद राष्ट्रवादावरच आधारला आहे. साम्यवाद जेथें प्रचलित आहे तेथें त्याचें सामर्थ्य, राष्ट्रीय वृत्तीशीं असलेल्या त्याच्या साहचर्यावर अंशतः अवलंबून असतें. जेथें या दोहोंचें साहचर्य नसतें तेथें साम्यवाद लुळा पडतो. दारिद्र्यानें पीडलेल्या देशांमध्यें आणि ज्यांचा पूर्ण विकास घडून आलेला नाहीं अशा देशांमध्यें जेथें असंतोष व्यक्त होत असतो तेथें त्याचें स्वरूप अर्थातच वेगळें असतें.

ज्या देशांत परकीय सत्तेचें वर्चस्व अद्यापही कायम आहे तेथें राष्ट्रवादाच्या ऊर्मीला, स्वातंत्र्य चळवळीचें स्वरूप अवश्य प्राप्त होतें. सामर्थ्यवान् आणि

स्वतंत्र देशांमध्यें राष्ट्रवादाचा कल, त्याला विरोधी प्रवृत्तींनीं थोडा फार आळा घातला तरी तो राज्यविस्ताराच्या प्रवृत्तीकडे झुकूं लागतो.

## ७

अशा रीतीनें युरोपमध्यें आणि इतरत्र एकीकरण घडवून आणण्याची प्रवृत्ति आणि परंपरागत राष्ट्रवाद व्यक्त करणाऱ्या आत्मकेंद्रित प्रवृत्ति यांचा संघर्ष चालूं असल्याचें आज आपल्या प्रत्ययाला येत आहे विज्ञान आणि तंत्रशास्त्र, विशेषत: दळणवळण यांचा अमर्याद विकास घडून आला असल्यामुळें अधिकाधिक व्यापक असें एकीकरण घडवून आणणें आपल्याला विशेष अगत्याचें झालें आहे. तेव्हां इतर बाबींप्रमाणेंच याही बाबतींत, आधुनिक जीवनाच्या मूलभूत गरजांना अभिव्यक्ति देणाऱ्या विज्ञानाचाच शेवटीं विजय होईल असें आपण गृहीत धरून चालायला हरकत नाहीं. खरा धोका राष्ट्रवादी संघर्षापासूनच असून त्यामुळेंच युद्ध निर्माण होण्याचा संभव आहे.

अशा संघर्षाचा संभव आज जगामध्यें अस्तित्वांत असलेल्या प्रमुख मतप्रणालींमधील प्रचारयुद्धानें वाढला आहे. या भिन्न मतप्रणालींच्या तथाकथित संघर्षाच्या मुळाशीं, एकमेकांविषयीं मनांत भीति बाळगणाऱ्या बड्या राष्ट्रांची राजकीय स्पर्धाच आहे. साम्यवादी आणि इतर राष्ट्रें यांच्या दरम्यान दृष्टिकोण, आर्थिक सिद्धान्त, स्वातंत्र्याची कल्पना आणि राज्यघटना या बाबतींत मूलभूत मतभेद आहेत. हे मतभेद कांहीं अंशीं कमी झाले असून ते आणखीही कमी होत जातील आणि त्यांच्यामध्यें आज जरी तीव्र विरोध दिसत असला तरी तो कमी होत जाईल. मानवी जीवनामधील बदल मतप्रणालीमुळें कांहीं तितकासा घडून येत नाहीं. विज्ञानाची आणि तंत्रशास्त्राची वाढ हींच सामाजिक आणि आर्थिक घटनेला सतत वळण लावतात. कार्य हेंच घटनेचें स्वरूप ठरवीत असतें. हाच नियम स्थापत्यशास्त्राला लागू होतो. सामाजिक घटनेमध्येंसुद्धां शेवटीं हाच सिद्धान्त खरा ठरतो. समाजाच्या कार्यानुसारच त्याची घटना ठरवली जाते. विज्ञानामुळें आणि तंत्रशास्त्रामुळें समाजाचें कार्य सतत बदलत राहतें आणि त्यायोगें नव्या कार्यांना अनुसरून समाजघटना बदलणें क्रमप्राप्त ठरतें.

यावरून हेंच दिसून येईल कीं एकादी विशिष्ट मतप्रणाली नव्हे तर तंत्र-

शास्त्राची प्रगति हीच आधुनिक जीवनांतील एक मूलभूत आणि अत्यंत क्रांतिकारी अशी बाब आहे. जेथें तंत्रशास्त्राची प्रगति मंद असते तेथें जुनीच घडण चालू राहते. अपुरा विकास झालेल्या आणि मागासलेल्या समाजाचें रूप आणि घटना मागासलेलीच असते आणि त्यामुळें तो समाज, आधुनिक विज्ञानयुगाशीं सुसंगत होऊं शकत नाहीं. परंतु जीवनांतील वस्तुस्थिति नाकारतां येत नाहीं. घडून येणारे बदल आणि त्यांच्या अनुषंगानें होणारे परिणाम हे अपरिहार्यच असतात. कांहीं वेळेला हे बदल आकस्मिक आणि अस्वस्थ करणारे असतात आणि त्यांची गति थोडी अधिक मंद असली तरी ते घडून येतातच.

लोकशाही समाजामध्यें म्हणजे जेथें प्रत्येक प्रौढाला मताधिकार असतो आणि कोणत्यातरी प्रकारची संसदीय शासनव्यवस्था असते तेथें समाजाचें कार्य आणि कांहीं अंशीं त्याची घडणसुद्धां बदलण्याची तरतूद केलेली असते. परंतु जुनी प्रस्थापित व्यवस्था आणि मिरासदारी यांचा पुरस्कार करणारे लोक कोणत्याही परिवर्तनाला विरोध करतात आणि परिस्थितीनें भाग पाडलें म्हणजेच मग त्याला मान्यता देतात. कोणतीही प्रस्थापित व्यवस्था, धार्मिक, आर्थिक किंवा सामाजिक अशा कोणत्याही परिवर्तनाला नेहमींच विरोध करते.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रमांक ....... वि.
क्रमांक ....... नों. दि.

जीवनामध्यें बदलत्या परिस्थितीशीं नेहमींच जुळतें घ्यावें लागतें. कोणत्याही राजकीय, आर्थिक किंवा सामाजिक व्यवस्थेमध्यें एक प्रकारची शिस्त असते; धर्माची शिस्त असते; सामाजिक रूढींचीही शिस्त असते आणि त्यामध्येंच एका विशिष्ट नैतिक आणि आध्यात्मिक शिस्तीचा अंतर्भाव झालेला असतो. समाजाचें कार्य आणि त्याची व्यवस्था बदलूं लागली म्हणजे जुन्या शिस्तीचा जोर कमी होतो. आणि हळुहळू तिच्या जागीं नवी शिस्त येते. गेल्या अर्धशतकांत तंत्रशास्त्राची झपाट्यानें प्रगति होत गेल्यामुळें सामाजिक परिवर्तन पूर्वीं कधींही झालें नसेल इतकें अपरिहार्य झालें आणि सतत अनवस्था निर्माण होत गेली. प्राचीन काळांत जीवन फार साधें होतें. निसर्गाशीं त्याचा अधिक निकट संबंध होता आणि मनन आणि चिंतन करण्याला वेळ होता. आज जीवन अधिक गुंतागुंतीचें झालें आहे. शांतपणें विचार करण्याला सवडच राहिलेली नाहीं. फावला वेळ असला तरीसुद्धां त्याचें काय करावें हें समजेनासें झालें आहे.

फुरसतीच्या वेळेचा कसा उपयोग करावा हा प्रश्न पुढारलेल्या देशांमध्यें अधिकाधिक बिकट होत चालला आहे. अर्थात हा प्रश्न भारतापुढें आज नाहीं आणि भविष्यकाळांतही तो लौकर निर्माण होण्याची शक्यता नाहीं. जीवनाचा निसर्गाशीं कांहींही संबंध राहिला नाहीं आणि यांत्रिक पद्धतीवर तें अधिकाधिक अवलंबून राहिलें तर त्यांतील स्वारस्य नाहींसें होऊं लागतें आणि कर्तव्याची त्याची जाणीवही नाहींशी होते; नैतिक आणि आध्यात्मिक शिस्त बिघडून जाते; एक प्रकारचा भ्रमनिरास झाल्यासारखें वाटतें आणि आपल्या संस्कृतींत कांहीं तरी चुकलें आहे अशी भावना निर्माण होते. कांहीं लोक पुन्हां निसर्गाच्या सान्निध्यांत जाण्याची आणि जुन्या काळचें साधें जीवन जगण्याची भाषा बोलूं लागतात. परंतु, या भाषेमध्यें कांहीं तथ्य असो वा नसो, पुन्हां तें जुनें जीवन जगणें शक्य नाहीं ही गोष्ट निर्विवाद आहे. कारण जगच बदलून गेलें आहे. एकादी व्यक्ति सर्वसंगपरित्याग करून संन्यास घेऊं शकेल; परंतु समाजाला तें शक्य नाहीं. सर्व अडीअडचणींसह असेल त्या जीवनाचा स्वीकार करून त्यावरच समाजाला आपली उभारणी करावी लागते आणि त्यांतूनच मार्ग काढावा लागतो. समाजानें तसें केलें नाहीं तर तो नष्ट होऊन जाईल.

विज्ञानाच्या आणि तंत्रशास्त्राच्या प्रगतीमुळें जगाचे बहुतेक सर्व आर्थिक प्रश्न सोडवणें आणि अखिल जगांतील प्रत्येक व्यक्तीच्या मूलभूत गरजा भागवण्याची सोय करणें निश्चित शक्य झालें आहे. त्याच्यामुळें उच्च जीवनमान प्राप्त होण्याची आणि सांस्कृतिक उन्नतीचे मार्ग मोकळे होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आज कल्याणकारी राज्य आणि वर्गविहीन समाजव्यवस्था हीं केवळ समाजसत्तावादाचींच ध्येयें राहिलेलीं नाहींत. भांडवलशाही देशांनींही हींच ध्येयें स्वीकारलीं आहेत. फक्त त्यांचे मार्ग भिन्न आहेत. अशा रीतीनें दोघांचीं मूलभूत ध्येयें जवळजवळ सारखींच झालीं असून त्यांचे मार्ग भिन्न असले तरी उद्दिष्टें गांठण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हे मार्ग किंवा कार्यपद्धति, केवळ तर्कशास्त्राच्या सिद्धान्तावरच नव्हे तर त्या देशाच्या किंवा समाजाच्या भौगोलिक, ऐतिहासिक, आर्थिक, धार्मिक, आणि सामाजिक पार्श्वभूमीवर आणि त्यांच्या सांस्कृतिक विकासावर आधारल्या जातात. कोणताही खराखुरा बदल, कोणावरही सहजासहजीं लादतां येत नाहीं. असा बदल घडूनच आला पाहिजे. कोणत्याही देशामध्यें विशेषत: ज्याची संस्कृति प्राचीन आहे आणि ज्याचा पाया भूतकालांत पक्का घातला गेला आहे अशा देशामध्यें, समूळ बदल घडवून आणणें शक्य नसतें. तसें केलें तर त्याची हानि झाल्याशिवाय रहात नाहीं अशा देशांत ज्यांचें खरोखर निर्मूलन करावें अशा विघातक आणि जुनाट रूढींचा आणि संस्थांचा बुजबुजाट झाला असला तरी समूळ बदल कधींच

घडवून आणतां येत नाहीं. निसर्गानें निर्माण केलेले कांहीं संकेत आकस्मिक रीतीनें बदलण्याचा प्रयत्न केला गेला तर हानिकारक परिणाम झाल्याशिवाय रहात नाहींत. त्याचप्रमाणें समाजांत किंवा देशांत रूढ झालेले जीवनाचे जुने मार्ग एकाएकीं बदलणें सोपें नसतें आणि तें इष्टही नसतें. हा प्रश्न अशा रीती सोडवण्याचा प्रयत्न केला गेला तर अधिक गंभीर आणि कठिण असे नवेच प्रश्न निर्माण होण्याचा संभव असतो.

हीं तत्त्वें बाह्य जगाला जितकीं लागू असतात. त्याहीपेक्षां अधिक प्रमाणांत तीं मानसिक जीवनाला लागू असतात. जमातीटोळक्यांमध्यें किंवा आदिवासी जमातींमध्यें कोणतेंही परिवर्तन झपाट्यानें घडवून आणण्याचा प्रयत्न केला गेला तर त्याचे फार भयंकर परिणाम होतात हें सर्वांना माहीतच आहे. अधिक उन्नत अशा समाजामध्यें एकदम बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला गेला तर त्याचे फारसे अनिष्ट परिणाम होणारही नाहींत. परंतु आजच्या 'जेट्' युगांत आणि भावी अंतरिक्ष-प्रवासयुगांत शारीरिक किंवा इतर कोणते बदल घडून येतील तें कोणालाही सांगणें शक्य नाहीं.

बाह्य जगामध्यें जर इतकें परिवर्तन घडून आलें तर मानवी मन, भावना आणि वृत्ति यांमध्यें आणखीनच परिवर्तन घडून येईल याविषयीं शंकाच नाहीं. मानवी इतिहासांत अभूतपूर्व अशी परिस्थिति आज निर्माण झाली आहे. परिवर्तन हा मानवाच्या प्रत्येक हालचालीचा आणि सामूहिक जीवनाचा एक अवश्य असा भाग बनला आहे. परिवर्तनाचा वेग आज इतका वाढला आहे कीं माणसाला तो सांभाळणेंही अशक्य झालें आहे. विज्ञानाच्या आणि तंत्रशास्त्राच्या फलप्राप्तीचा जरी लाभ होत असला तरी मानवजातीला त्याचा अर्थ क्वचितच कळतो. मानवाची सर्वांगीण उन्नति घडवून आणणें आणि समाजाला उपयुक्त असलेलीं कार्यें करण्याला आणि सामूहिक जीवनांत भाग घेण्याला तरुण पिढीला समर्थ बनवणें हाच शिक्षणाचा उद्देश असतो. परंतु समाज जर दररोज बदलत जात असेल तर कोणाला आणि कसें तयार करायचें आणि कोणतीं उद्दिष्टें पुढें ठेवायचीं हें सांगणें कठिण आहे. अति उच्च तंत्रशास्त्रावर आधारलेली संस्कृति आणि जुन्या सामाजिक जीवनपद्धति आणि त्यांच्या मुळाशीं असलेलें तत्त्वज्ञान यांच्यामध्यें सुसंगतीचा अभावच असतो. निसर्गाबरोबरच्या संबंधांत आणि स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाबरोबरच्या संबंधांतही बदल घडून येतो. यांत्रिक संस्कृतीवर आधारलेल्या समाजपद्धतीमध्यें मानवी व्यक्तिमत्त्वाचें मूल्य कमी होत जातें. समाजजीवनामध्यें व्यक्तिमत्त्व नाहींसें होतें आणि एकंदर समाजाची सामूहिक आणि आर्थिक उन्नति घडवून आणण्याचें ध्येय सतत पुढें ठेवणाऱ्या गूढ समाजरचनेमध्यें व्यक्ति ही केवळ एक साधन बनूं लागते.

व्यक्तीचा विकास आणि व्यक्तिस्वातंत्र्य यांना आपल्यापैकीं बहुतेकजण बहुमूल्य मानतात. या प्रक्रियेला मतप्रणालींची पार्श्वभूमि साहाय्यक ठरते किंवा व्यत्ययकारकही ठरते. परंतु यांत्रिकीकरण हेंच व्यक्तीचें मूल्य कमी करण्याच्या बाबतींत सर्वांत महत्त्वाचें कारण असतें.

९

तंत्रशास्त्रानें त्वरित घडवून आणलेल्या बदलांचे परिणाम, विशेषेंकरून आजच्या तरुण स्त्रीपुरुषांमध्यें आपल्याला प्रामुख्यानें दिसून येतात. तरुण आणि प्रौढ यांच्यामध्यें दिसून येत असलेली भिन्नता, आईबापांना, शिक्षण-तज्ज्ञांना आणि सामाजिक कार्यकर्त्यांना बेचैन करून सोडते. वडीलमंडळींनीं आजपर्यंत स्वीकृत केलेल्या आचारपद्धति आतां अमान्य केल्या जात आहेत आणि जुनीं नैतिक प्रमाणें त्याज्य ठरवलीं जात आहेत. आत्यन्तिक बाबतींत जीवनाविषयीं उदासीन आणि अभावात्मक वृत्ति दिसून येतेच परंतु त्याशिवाय गुन्हेगारी, मदिरापान, विघातक बुद्धि आणि कामांधता यांकडे प्रवृत्ति दिसून येते. घडीघडीला बदलत असलेल्या जगामध्यें कोणत्याही प्रकारची शाश्वती नसल्यामुळें सुखवादी जीवनाचीं तत्त्वें स्वाभाविकच अधिक प्रिय वाटूं लागतात; राष्ट्रीय संस्कृतीच्या सातत्याला धोका निर्माण होतो आणि समाज विस्कळीत होण्याचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागतात.

हें मत कदाचित् अतिरंजित स्वरूपाचें असेल. आज जें कांहीं घडत आहे त्याचें यथायोग्य मूल्यमापन त्यायोगें होतही नसेल. परंतु ह्या प्रवृत्ति, भारत किंवा इतर मागासलेल्या देशांपेक्षां अधिक उन्नत आणि पुढारलेल्या देशांमध्येंच अस्तित्वांत आहेत याविषयीं शंका नाहीं. कदाचित् झपाट्यानें बदलत जाणाऱ्या काळाचा हा क्रमप्राप्त परिणामही असूं शकेल. त्यायोगें विज्ञान आणि तंत्रशास्त्र यांच्याशीं जुळूं शकेल अशा नव्या संस्कृतीचा पाया घातला जाईल आणि त्या बरोबरच नव्या मतप्रणाली, सामूहिक जीवनाच्या नव्या पद्धति आणि वस्तुतः व्यापक असें जीवनाचें नवें तत्त्वज्ञान यांची निर्मिती होईल.

आज जें कांहीं घडत आहे त्याविषयीं मीं व्यक्त केलेलें हें माझें मत अत्यंत निराशावादी आहे किंवा नाहीं तें मी सांगूं शकत नाहीं. भारतांत किंवा जगांत घडत असलेल्या घटनांविषयींची माझी प्रतिक्रिया निराशावादी नाहीं. माझ्या ठिकाणीं जी एक श्रद्धा आहे तिचें मी पृथक्करण किंवा स्पष्टीकरण करूं शकत

नाहीं. परंतु तिच्यामुळें भविष्याविषयीं मी पूर्ण आशावादी आहें. माझा हा आशावाद मला पुष्कळ अंशीं लाभलेल्या सुदैवामुळेंही असूं शकेल. भारतीय जनता माझ्यावर जें अमर्याद प्रेम करते तेंच माझें सर्वांत मोठें भाग्य आहे. परंतु मी परकीय देशांत गेलों असतांनाही सर्व ठिकाणच्या लोकांनीं माझें स्नेहपूर्ण आणि हार्दिक स्वागतच केलें आहे. भारतीय जनतेविषयीं मला फार प्रेम आहे, तिच्यावर माझी श्रद्धा आहे आणि इतर देशांतील जनतेविषयींही मला प्रेम आणि आदर आहे. जसें द्यावें तसें घ्यावें हेंच तत्त्व खरें आहे. आपण लोकांवर प्रेम केलें तर लोकही आपल्यावर भरपूर प्रेम करतात. परंतु आपण दुसऱ्यांचा द्वेष केला तर दुसरेही आपला द्वेष करतात. प्रत्येक ठिकाणच्या लोकांना शांतता, सद्भावन आणि सहकार्य पाहिजे आहे, अशी माझी खात्री पटली आहे. मी म्हणतों अशी जर परिस्थिति असेल आणि तशी ती आहे याविषयीं मला शंका नाहीं.–तर संघर्षाच्या ऐवजीं सहकार्य आणि युद्धाच्या भाषेच्या ऐवजीं शांतिकार्य सुरू करण्याच्या दृष्टीनें घडामोडींना निराळें वळण लावणें आपल्याला शक्य होईल.

भीति हेंच सर्वांत मोठें संकट आहे असें मला वाटतें. कारण भीतीच्या पोटींच संघर्ष आणि अत्याचार जन्माला येतात. अत्याचार ही भीतीचीच प्रतिक्रिया आहे आणि त्याचप्रमाणें असत्यही. अभयदान हें सर्वांत मोठें दान आहे असें प्राचीन काळापासून मानलें जातें. निर्भय मनाचा मनुष्य, कोणत्याही गोष्टीचा विचार. योग्य दृष्टीनें करूं शकतो आणि आचार–विचारांत एक प्रकारची सचोटी राखूं शकतो. आज जग भीतीनें ग्रस्त झालें असल्याचें आपल्याला आढळून येत आहे. सर्वांत मोठीं आणि बलाढ्य राष्ट्रेंही भीतीनें ग्रासलेलीं दिसत आहेत. संपत्ति आणि सामर्थ्य यांच्यामुळें भीतीची भावना कमी न होतां ती वाढतच असल्याचें दिसत आहे. साधु किंवा थोर पुरुष व यांच्याखेरीज इतर कुणालाही पूर्ण निर्भय होणें शक्य नाहीं. परंतु निर्भय होण्याचें ध्येय पुढें ठेवणें आणि तें साध्य करण्याचा प्रयत्न करणें आपल्याला शक्य आहे. गांधीजींनीं आपल्या लोकांच्या मनांतील भीतीची भावना कमी केली हीच त्यांनीं भारताची केलेली सर्वांत मोठी सेवा आहे.

निर्भयतेच्या पोटीं दया आणि सहिष्णुता निर्माण होते. बुद्धाचा विचार मनांत येतांच त्याची दयेची भावना आपलें मन भारून टाकते. अशोकाचा आपण विचार करूं लागलों म्हणजे त्याची अमर्याद सहिष्णुता, आपल्याला आपल्या संकुचित सांप्रदायिक वृत्तीचा त्याग करायला शिकवते.

राष्ट्रीय, आंतर्राष्ट्रीय आणि त्याचप्रमाणें वंश, धर्म, पंथ आणि वर्ग इत्यादिविषयक अनेक प्रकारच्या कलहांनीं हें जग भरून गेलें आहे. हे कलह अस्तित्वांतच नाहींत असें म्हणणें किंवा त्यांची उपेक्षा करणें हास्यास्पद ठरेल. हे

कलह मिटवण्याचा प्रयत्न, कलहाच्या वृत्तीनें नव्हे तर शांततेच्या मार्गांनींच करणें जरूर आहे.

## १०

आंतराष्ट्रीय दृष्ट्या, जागतिक शांतता हाच आजचा प्रमुख प्रश्न आहे. त्य दृष्टीनें, आपल्याला क्लेशदायक असलेले इतर मोठमोठे प्रश्न आणि तंटे सोडवण्याचा प्रयत्न करणें आवश्यक आहे. ही सोडवणूक कशी होऊं शकेल हें मी सांगूं शकत नाहीं. परंतु त्यासाठीं आपण कोणत्या साधनांचा उपयोग करावयाचा आणि कोणते मार्ग अनुसरायचे यासंबंधीं आपल्या मनांत यत्किंचितही संदेह असतां कामा नये. सर्वसंहारक युद्ध पत्करायचें का या प्रश्नांची कोणत्यातरी शांततामय मार्गांनीं सोडवणूक करायची हेंच आज आपल्याला ठरवायचें आहे. आपल्यापुढें हेच जर पर्याय असतील तर आपला मार्ग स्पष्ट आहे–आणि तो मार्ग स्वीकारल्यानंतर जगांतील तेढ ज्यायोगें वाढेल असें कांहींही करण्याचें आपण टाळलेंच पाहिजे. आज युद्ध शक्य नाहीं असा पक्का निर्णय आपण केलाच पाहिजे. कारण युद्धानें विजय मिळेल किंवा त्या विजयापासून कांहीं फलप्राप्ति होईल अशी यत्किंचितही ग्वाही मिळूं शकत नाहीं. तेव्हां सदैव युद्धाच्या पवित्र्यांत राहणें किंवा निकरावर येणें असमंजसपणाचेंच आहे. आपला एकमेकांशीं मतभेद असला तरीही आपण एकमेकांवर त्वेषानें टीका करण्याचें आणि एकमेकांचा धिःकार करण्याचें टाळलें पाहिजे. अर्धेअधिक जग दुष्ट आहे किंवा दुष्टांचें त्यावर वर्चस्व आहे असें कोणत्याही गटानें म्हणणें हास्यास्पद आहे, या गोष्टीची आपण जाणीव ठेवली पाहिजे. भांडवलशाही जगावर किंवा साम्यवादी जगावर टीका करणें सोपें आहे. परंतु दोहोंच्याही ठिकाणीं कांहीं दोष असले तरी फार मोठे गुणही आहेत. त्यांच्या ठिकाणीं आंतरिक संघर्ष जरी असले तरी तीं एकाच दिशेनें जात आहेत आणि त्यांचे सर्व व्यवहार विज्ञानाच्या आणि तंत्रशास्त्राच्या प्रगतीनें नियमित झाले आहेत. तेव्हां जगाचा आहे त्या स्थितींत स्वीकार करणें आणि एकमेकांविषयीं सहिष्णुता वाढवणें हा एकच मार्ग आपल्याला मोकळा आहे. एकमेकांच्या थाऱ्यालाही उभ्या न राहणाऱ्या धर्मांचीं जुनीं भांडणें युद्धानंतर हळूहळू मिटलीं आणि एक नवी सहिष्णुता वाढीला लागली. प्रतिस्पर्धी अशा आर्थिक आणि सामाजिक तत्त्वप्रणालींच्या दरम्यानही सहिष्णुता वाढण्याला

कांहींच हरकत नाहीं. तत्त्वप्रणालींची रूपरेषा शेवटीं जीवनाच्या वस्तुस्थितीनेंच निश्चित केली जाते. कोणत्याही देशाला त्याचा विकास त्याच्या स्वतःच्याच मार्गानें घडवून आणण्याची मोकळीक असली पाहिजे. त्यानें वाटलें तर दुसऱ्यापासून शिकावें; परंतु कोणतीही गोष्ट त्याच्यावर लादली जातां कामा नये. असें झालें तरच सर्व तत्त्वप्रणालींचा एकमेकींवर प्रभाव पडेल.

राष्ट्रावादाची वृत्ति ही लोकांची एक निकोप आणि इष्ट अशी अवस्था आहे असें मानलें जातें. ती दडपून टाकण्याचा प्रयत्न केला गेला तर तिची प्रतिक्रिया फार जोरदार होते आणि सत्ताभिलाषाची तिला जोड मिळाली तर आक्रमक आणि लढाऊ देशाभिमानाचें स्वरूप तिला प्राप्त होतें. आधुनिक राष्ट्रवाद ही परकीय साम्राज्यशाहीची आणि वर्णभेदात्मक धोरणाची प्रतिक्रियाच आहे.

वर्णविद्वेष हा थोड्याफार प्रमाणांत अनेक देशांत अद्यापही अस्तित्वांत आहे. परंतु सर्वसाधारणपणें त्याचा धिःकारच केला जातो. फक्त दक्षिण आफ्रिकेच्या संघराज्यांतच त्याला सरकारी मान्यता मिळाली आहे. वर्णविद्वेषाचें धोरण हें संघर्षाचें महाभयंकर मूळ असून अति हीन प्रकारच्या वर्चस्वाचा त्यामुळें पुरस्कार होतो. आत्यन्तिक कडवटपणा आणि तीव्र अशी प्रतिक्रिया त्यायोगें निर्माण होणें अपरिहार्य ठरतें. हा संघर्ष अत्याचारी मार्गांनींच सोडवला गेला तरी चालेल असें म्हणणें निराशावादाचें लक्षण आहे. त्याशिवाय क्रमप्राप्तरीतीनें त्याचे जे हानिकारक परिणाम घडून येतील ते वेगळेच. वर्णविद्वेषाच्या धोरणाविरुद्ध जागतिक लोकमत इतकें तीव्र होऊन जाईल, कीं कोणत्याही देशाला किंवा गटाला त्याचा पुरस्कार करणें किंवा तें आचरणांत आणणें अशक्य होईल.

साम्राज्यशाही किंवा वसाहतशाही कोणत्याही स्वरूपांत असली तरी ती आजच्या जगाशीं पूर्णपणें विसंगत असून संघर्षाचें ती मूळ आहे. कित्येक ठिकाणीं ती अद्यापही अस्तित्वांत असून अनेकांच्या मनावर तिची छाप आहे. परंतु हें तत्त्वज्ञान त्याज्य मानलें गेलें असून प्रत्येक ठिकाणीं त्याला आपलें समर्थनच करण्याचा प्रसंग येत आहे. तेव्हां वर्णविद्वेषाच्या धोरणाचा आणि साम्राज्यशाहीचा शेवट घडवून आणणें आणि प्रत्येक देशाला त्याचें भवितव्य घडवण्याची मोकळीक देणें हेंच जागतिक धोरण असलें पाहिजे. त्यामुळें कांहीं देशांमध्यें अव्यवस्था आणि गोंधळ माजण्याचा संभव आहे. परंतु ही स्थिति त्या देशांपुरतीच मर्यादित राहील, अधिक मोठ्या विभागांना तिची बाधा होणार नाहीं आणि कांहीं काळानंतर ती आपोआपच सुधारेल असें म्हणायला हरकत नाहीं. एका देशानें दुसऱ्या देशावर आपले विचार लादण्याचा प्रयत्न करणें ही आज एक अत्यंत चुकीची आणि अनर्थकारक गोष्ट आहे.

लष्करी दोस्तीचे करार आणि प्रचार-युद्ध यांचें समर्थन गतकाळांत कसेंही केलें गेलें असलें तरी आज त्यांनीं असुरक्षिततेची भावना आणि युद्धाची भीतीच निर्माण केली आहे. त्यामुळें, सर्वसाधारणपणें होणाऱ्या राष्ट्रविकासाला प्रतिबंध होतो आणि जगांतील वातावरण गढूळ होऊन जातें. प्रचार-युद्ध चालू असेतोंपर्यंत सहिष्णुतेला वावच राहणार नाहीं. ज्या देशांचा पूर्ण विकास घडून आलेला नाहीं त्यांना त्यांच्या विकासाला आणि त्यांचें राहणीचें मान वाढवण्याला मदत करण्याऐवजीं लष्करी विचारांनाच अधिक प्राधान्य दिलें जातें आणि लोकांना अप्रिय असलेल्या प्रतिगामी राजवटींना उचलून धरलें जातें. अशा रीतीनें असुरक्षिततेच्या भावनेंत आणखीनच भर पडते.

जगाला सतावून सोडणाऱ्या प्रश्नांचें किंवा कलहांचें आणि विकारांचें निराकरण, जादूची कांडी फिरवून किंवा कांहींतरी मंत्रांचा उच्चार करून करतां येईल असें म्हणणें अवास्तववादीपणाचें आहे. परंतु ज्यायोगें तेढीच्या भावना कमी होतील आणि संघर्षाचा संभव शेवटीं नाहींसा होईल असा कार्यक्रम सुचवणें पूर्णपणें वास्तववादी ठरेल. जागतिक प्रश्नांकडे पाहण्याची एक नवी दृष्टि आणि तिच्याशीं सुसंगत अशीं राजकीय आणि आर्थिक धोरणें हेंच या कार्यक्रमाचें अस्सल स्वरूप आहे. सर्वश्रुत अशा पंचशील तत्त्वांनीं हा नवा मार्ग सुलभ करून दिला आहे. परंतु मनांत किंवा अंतःकरणांत खरा बदल घडून आला तरच हा मार्ग यथार्थ होईल; केवळ अर्थशून्य शब्दांच्या बडबडीनें कांहींही साधणार नाहीं. प्रत्यक्ष युद्धाचा अभाव म्हणजे शांतता असें म्हणतां येत नाहीं. अखिल जगामध्यें शांततेचें वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न म्हणजेच शांतता.

## ११

भारतानें आंतरराष्ट्रीय व्यवहारांत हें धोरण अनुसरण्याचा प्रयत्न चालवला आहे. त्यांत आम्ही नेहमींच यशस्वी झालों आहों असें मी म्हणूं शकत नाहीं. परराष्ट्रीय धोरणें हीं शेवटीं अंतर्गत परिस्थितीवर आणि विकासावरच अवलंबून राहतात. तेव्हां जागतिक घडामोडींमध्यें आपल्याला जर यथार्थ भूमिका बजावायची असेल तर अंतर्गत प्रगति आपल्याला फार अगत्याची आहे. खुद्द भारताच्या हितसंवर्धनाच्या दृष्टीनें तर ती अधिकच अगत्याची आहे.

पहिल्या पंचवार्षिक योजनेनंतर आणि द्वितीय योजनेच्या दोन वर्षांनंतर, अनेक बाबतींत आपण निश्चित प्रगति केली आहे. कांहीं बाबतींत ही प्रगति डोळ्यांत भरण्यासारखी आहे तर कांहीं बाबतींत ती सर्वसाधारण आहे. परंतु प्रगतीचा वेग, कांहीं बाबतींत आमच्या अपेक्षेप्रमाणें चांगला राहिलेला नाहीं. तरीपण ही प्रगति भरीव आहे असें आपण खात्रीनें म्हणूं शकतों. शेतकी आणि उद्योगधंदे या क्षेत्रांतील प्रगति डोळ्यांत भरण्यासारखी असून शेवटीं या प्रगतीवरच आपलें भवितव्य अवलंबून आहे.

शिक्षण हा या प्रगतीचा पाया असून मूलोद्योग शिक्षण आणि धंदेशिक्षण या दोहोंचा प्रसार करण्याकडे पुष्कळ लक्ष पुरवलें जात आहे. लक्षावधि मुलें–मुली शाळा–कॉलेजांतील अभ्यासक्रम पुरा करीत असून लाखों जणांना विद्यापीठांतून आणि धंदेशिक्षण–संस्थांतून प्रशिक्षित केलें जात आहे. शिक्षण घेणाऱ्यांची ही संख्या, भारतीय जनसंख्येचा एक अल्पसा भाग आहे आणि याबाबतींत आम्हांला अद्यापही पुष्कळ कार्य करायचें आहे. तरीसुद्धां शिक्षण घेणाऱ्यांची ही संख्या फार मोठी आहे. हे विद्यार्थी शाळा–कॉलेजांतून जेव्हां बाहेर पडतात तेव्हां जीवनव्यवहाराविषयीं त्यांना नवी दृष्टि प्राप्त झालेली असते. अशा रीतीनें हळूहळू पण अपरिहार्यपणें आमची सामाजिक घडण बदलत चालली आहे. सर्वांत मोठा आणि कदाचित् सर्वांत अधिक क्रांतिकारी बदल स्त्रीशिक्षणाच्या प्रसारानें घडून येत आहे. भारतीयांच्या अखिल जीवनावर याच स्त्रियांची छाप असून क्रमाक्रमानें त्या भारतीय जीवनामध्यें बदल घडवून आणतील. सध्याच्या घडीला हे बदल, ग्रामीण विभागांपेक्षां लहानमोठ्या शहरांतच अधिक प्रमाणांत घडून आले आहेत. परंतु आमच्या खेड्यांवरसुद्धां त्यांचा परिणाम होत असून आणखी थोड्याच वर्षांच्या कालावधींत, शालेय शिक्षण घेण्यास योग्य अशा सर्व मुलांना मूलोद्योग शिक्षणाचा लाभ मिळूं लागेल.

वर्तमान शिक्षणपद्धतीवर अनेकांनीं अनेक प्रकारें टीका केली आहे. तरीसुद्धां शिक्षणाचा प्रसार झपाट्यानें होत आहे आणि त्यामुळें आपल्या राहणीचें रंग-रूपच बदलून जात आहे.

लोकसंख्येचाही प्रश्न आहेच. अखिल जगामध्यें लोकसंख्येची बेसुमार वाढ झाली आहे. या वाढीचें हें प्रमाण असेंच जर चालूं राहिलें तर या शतकाच्या अखेरीला जागतिक लोकसंख्या साडेतीन अब्जांपासून पांच अब्जांपर्यंत जाण्याचा संभव आहे! इसवी सन वीसशेंपर्यंत भारतांतील लोकसंख्या साठ ते अडुसष्ट कोटींपर्यंत जाईल असा अंदाज आहे! लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणाला आपण कांहींसा आळा घालूं शकलों तरीसुद्धां आपली लोकसंख्या किमान साठ कोटीं-पर्यंत जाईल असा संभव आहे.

लोकसंख्येच्या वाढीचे दोन मुख्य परिणाम आहेत. त्यांपैकीं आपल्याला विशेष चिंताजनक वाटण्यासारखा एक परिणाम असा, कीं ही वाढ आपल्या आर्थिक प्रगतीच्या आड येते आणि इतर अनेक बाबतींत जरी आपली प्रगति घडून येत असली तरी आपलें राहणीचें मान तिच्यामुळें निकृष्टच राहतें. दुसरा परिणाम असा कीं जागतिक लोकसंख्येच्या बेसुमार वाढीमुळें जागतिक साधन-संपत्तीचा आणि औद्योगिक सामुग्रीचा भयंकर वेगानें फडशा पडत आहे. या बाबतींत अमेरिका जशी आज वागत आहे, तसेंच जर अखिल जग वागूं लागलें तर बहुधा या शतकाच्या अखेरीपर्यंत, जगांत आज उपलब्ध असलेली सर्व सामुग्री खपून जाईल. अर्थात असें होण्याचा संभव नाहीं. परंतु इतर देशांत खपाचें प्रमाण जरी पुष्कळच कमी असलें तरी उपलब्ध सामुग्री कांहीं शेकडों वर्षांपेक्षां अधिक काळ पुरणार नाहीं.

यावरून दोन निष्कर्ष निघतातः एक असा, कीं लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणाला आपण आळा घातला पाहिजे आणि दुसरा असा, कीं आपण इतर साधन–शक्ति आणि सामुग्री शोधून काढली पाहिजे. ही इतर साधन–शक्ति अणुशक्तीच्या विकासापासून आपल्याला मिळण्याची शक्यता आहे. भारतामध्यें लोकसंख्येच्या वाढीला कसा आळा घालायचा याचीच आम्हांला सर्वांत अधिक चिंता लागली आहे. हा प्रश्न केवळ महत्त्वाचाच नव्हे तर आत्यंतिक निकडीचा झाला आहे.

## १२

दोन मूलभूत गोष्टी आपण ध्यानांत ठेवणें अगत्याचें आहे. एक अशी कीं कांहीं देशांमध्यें उत्पादनक्षमता कमालीची वाढली आहे आणि विज्ञानाच्या आणि तंत्रशास्त्राच्या प्रगतीमुळें त्यांच्या संपत्तीची आणि सामर्थ्याची वाढ झाली आहे. दुसरी गोष्ट म्हणजे हीं समृद्ध आणि सामर्थ्यवान् राष्ट्रें आणि ज्यांचा पुरा विकास घडून आलेला नाहीं अशीं राष्ट्रें, यांच्यामध्यें असलेली अमर्याद विषमता. ही विषमता वाढतच जाते आणि वस्तुतः अपुरा विकास झालेल्या राष्ट्रांनीं आपलें जीवनमान सुधारण्याचा प्रयत्न केला असला तरीही गेल्या कांहीं वर्षांत ही विषमता पुष्कळच वाढलेली आहे. सर्वसाधारण आर्थिक आणि इतर शक्तींना जर भरपूर वाव दिला गेला तर त्यायोगें श्रीमंत राष्ट्रें अधिक

श्रीमंत आणि अधिक सामर्थ्यवान् बनतात आणि इतर राष्ट्रांना, त्यांच्या मूलभूत गरजा भागवतां भागवतां नाकीं नऊ येतात. ज्यांच्याजवळ आधींच कांहींतरी आहे त्यांनाच आणखी मिळतें. खुद्द देशांतल्या देशांतसुद्धां आपल्याला हेंच आढळून येतें, कीं जे विभाग अधिक विकसित असतात त्यांची प्रगति इतर विभागांपेक्षां अधिक प्रमाणांत घडून येते.

याचा परिणाम असा होतो, कीं राष्ट्राराष्ट्रांदरम्यान संघर्ष आणि युद्धाचे धोके निर्माण होतात आणि अपुरा विकास झालेल्या देशांत सामाजिक अशांतता वाढते. एका बाजूला सामर्थ्य आणि संपत्ति हीं प्रतिस्पर्धा आणि संघर्ष यांना कारणीभूत असल्याचें आढळून येतें. तर दुसरीकडे दारिद्र्य आणि हालअपेष्टा यांच्यामुळें उलथापालथ आणि संघर्ष होत असल्याचें दिसून येतें या दोन्ही परिस्थितींमुळें भीति आणि असुरक्षितता निर्माण होत आहे. संपत्तीचें आणि सत्तेचें अवाजवी केंद्रीकरण झाल्यानें सुरक्षितता निर्माण होत नाहीं आणि जगामध्यें प्रभावी असलेल्या शक्तींची योग्य जाणीव होण्याला प्रतिबंध होतो. तेव्हां राष्ट्रांराष्ट्रांमधील किंवा राष्ट्रामध्येंच असलेली अंतर्गत विषमता कमी करणें अगत्याचें आहे.

अणुयुगांतील प्रश्न गतकाळांत रूढ झालेल्या दृष्टिकोणांनीं सोडवणें शक्य नाहीं. राजकारणामध्यें किंवा आर्थिक व्यवहारामध्येंही या रूढ कल्पनांची फलनिष्पत्ति समाधानकारक होऊं शकत नाही. प्रचार–युद्धांबरोबरच भीति आणि द्वेष निर्माण होतो. अशा प्रकारच्या युद्धानें मानवजातीला असलेले धोके वाढतात आणि कोणत्याही प्रश्नाच्या सोडवणुकीची शक्यता राहत नाहीं. तरीसुद्धां आंतरराष्ट्रीय व्यवहारांत प्रचारयुद्ध चालू ठेवलें जातें ही गोष्ट सुज्ञपणाचा अभावच दर्शविते. अण्वस्त्राच्या प्रत्येक चांचणी प्रयोगाचे परिणाम वर्तमान आणि भावी पिढ्यांना अत्यंत हानिकारक आहेत असें नामवन्त वैज्ञानिक आपल्याला सांगत असतांनाही हे प्रयोग चालूच ठेवले जात आहेत. तेव्हां कोणत्याही नैतिक तत्त्वाचा किंवा तर्कशुद्ध विचारसरणीचा आधार नसलेलीं हीं जुनाट धोरणें कां अनुसरलीं जावींत हें समजत नाहीं. अण्वस्त्रांचे सर्व चांचणी प्रयोग थांबवण्याचा आणि शस्त्रसामर्थ्य क्रमाक्रमानें कमी करण्याचा निर्णय, तात्काल आणि एकमुखानें केला जाईल अशी अपेक्षा करणें स्वाभाविकच आहे. कोणतीही एकतर्फी योजना करण्याला भीतीनें प्रतिबंध केला तरी सारासार विचारशक्तीनें, प्रत्येक देशाला हितकारक असे द्विपक्षीय करार घडवून आणले पाहिजेत.

हाच युक्तिवाद आर्थिक सिद्धान्तांना आणि धोरणांना लागू पडतो. आज जगांतील पुष्कळशा देशांत, बहुजनसमाज दारिद्र्यावस्थेंत असून फारच थोड्या

देशांत समृद्धि आणि अनुकूल परिस्थिति नांदत आहे. जगाच्या या अशा अवस्थेंत अंगभूत असलेल्या धोक्यांची जाणीव फारच थोड्यांना आहे. ज्या देशांचा पूर्ण विकास घडून आलेला नाहीं त्यांनीं आपलें जीवनमान सुधारणें जितकें निकडीचें आहे तितकेंच ही प्रक्रिया त्वरेनें पूर्ण व्हावी म्हणून अधिक समृद्ध देशांनीं प्रयत्न करणें हें त्यांच्याच हिताच्या दृष्टीनें अगत्याचें आहे. आजचे हे प्रश्न नव्या जगाचे प्रश्न असून जुन्या जगाच्या पद्धती लागूं करून ते सोडवणें शक्य नाहीं.

जगाच्या सामाजिक उन्नतीची उपेक्षा करून अमाप पैसा शस्त्रास्त्रनिर्मितीसाठीं खर्च केला जावा ही अत्यंत दुःखाची गोष्ट आहे. समेट घडवून आणण्याचा मार्ग मोकळा असतांनाही भीतीचें आणि हटवादीपणाचें वातावरण चालूं रहावें ही आणखीनच खेदाची गोष्ट आहे. लष्करी धोरणाचा अवलंब करून समेट घडून येत नाहीं. कारण या धोरणानें आणखीनच भीति आणि तेढ निर्माण होते. मी कोणत्याही एका विशिष्ट देशाला दोष देत नाहीं. कारण सर्वच देश, थोड्या फार प्रमाणांत, या भीतीच्या वातावरणानें ग्रस्त झाले असून त्यांना त्यांतून सर्वस्वी बाहेर पडणें अशक्य झालें आहे. तेव्हां इतर राष्ट्रांबरोबरच्या आपल्या संबंधांत हें वातावरण बदलण्याचा आटोकाट प्रयत्न करणें एवढेंच आपल्या हातीं आहे.

भांडवलशाहीच्या आरंभाच्या दिवसांत – किंबहुना आजसुद्धां जास्तींत जास्त भर उत्पादनावर दिला जातो. त्यावेळीं तें जरूर होतें. परंतु केवळ उत्पादनानें आपले प्रश्न सुटत नाहींत किंवा सुख आणि समाधानही प्राप्त होत नाहीं ही गोष्ट अधिकाधिक प्रमाणांत प्रत्ययाला येत आहे. अधिकाधिक संपत्ति आणि समृद्धि प्राप्त करून घेण्याची लालसा भ्रष्टाचारांना प्रवृत्त करते आणि मत्सर आणि संघर्ष निर्माण करते. एकाद्या समाजांत किंवा अखिल जगामध्यें सामाजिक समतोलपणा हेंच जर ध्येय असेल तर केवळ उत्पादनानें तें साध्य होण्यासारखें नाहीं; किंबहुना त्यायोगें अधिकच असमतोलपणा निर्माण होतो. तेव्हां न्याय्य वांटप आणि उत्पादनाचा योग्य उपयोग हाच महत्त्वाचा प्रश्न ठरतो. जीवन कसें जगावें आणि स्वतःसाठीं आणि समाजासाठीं जीवनाचा जास्तींत जास्त उपयोग कसा करून घ्यावा हाच सुज्ञपणा माणसाच्या ठिकाणीं असला पाहिजे असें पूर्ण विचारान्तीं आढळून येतें. आर्थिक धोरण हें मानवी किंवा नैतिक प्रश्नांपासून वेगळें असतें आणि निसर्गाच्या नियमांचेंच तें स्पष्टीकरण करतें असें मानणें आतां यापुढें शक्य नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
१३अनुक्रम ............... वि: ..........
क्रमांक ............... नों: दि: ..........

अधिक व्यापक अशा या प्रश्नांचा मीं वारंवार उल्लेख केला आहे. कारण आपल्याला ते टाळतां येत नाहींत. आपल्या अंतर्गत प्रश्नांवरही त्यांचा प्रभाव असतो. परंपरागत कल्पनांनीं आपण इतके जखडलेले आहोंत, कीं आपल्या प्रश्नांचा वर्तमानकाळच्या संदर्भानें विचार करणेंही आपल्याला कठीण होतें. दारिद्र्यानें अवनति होते आणि म्हणूनच त्यापासून मुक्त व्हावें अशी स्वाभाविक प्रतिक्रिया होते. दारिद्र्य असतांना स्वातंत्र्याची भाषा बोलणें म्हणजे जवळ जवळ परस्परविरोधी भाषा बोलण्यासारखेंच आहे. एकदां दारिद्र्य आलें कीं तें तसेंच चालू राहण्याचा संभव असतो हीच सर्वांत वाईट गोष्ट आहे. परंतु वाजवीपेक्षां अधिक संपत्ति आणि समृद्धि, व्यक्तीला काय किंवा समाजाला काय, कुणालाही लाभली तरी तिच्या अनुषंगानें अनेक अनिष्ट गोष्टी उद्भवतात, याचा प्रत्यय आज आपल्याला सर्वत्र येत आहे. केवळ जड संपत्तीचा अमाप संचय करण्यानें माणसाचें आंतरिक जीवन शून्यवत् होण्याचा संभव असतो.

समाजवादी धोरण हें निःसंशय आर्थिक धोरण आहे. परंतु तें इतरही प्रश्नांचा विचार करतें. समाजवादानें समृद्धि प्राप्त करून दिली आणि न्याय्य असें वांटप घडवून आणलें तरीसुद्धां जीवनाचीं कांहीं अर्थपूर्ण वैशिष्ट्यें गमावलीं जाण्याचा त्यामध्यें धोका असतो. बहुतांशीं याच कारणासाठीं व्यक्तीवर भर देणें अगत्याचें होतें.

आज भारतामध्यें आपले प्रश्न आर्थिक उन्नतीचे आणि जीवनमान वाढवण्याविषयींचे आहेत. समाजवादी पद्धतीची समाजरचना म्हणजे काय याची आम्हीं जरी निश्चित व्याख्या केलेली नसली तरी तेंच उद्दिष्ट आम्हीं आमच्यासमोर हेतुपुरःसर ठेवलें आहे. मला वाटतें, कीं निश्चित व्याख्या करण्याचें टाळणें हेंच अधिक इष्ट आहे. कारण अशा व्याख्या हटवादीपणाच्या आणि घोषणात्मक स्वरूपाच्या होतात आणि झपाट्यानें बदलत असलेल्या जगामध्यें शुद्ध विचार करणेंही अशक्य होतें. परंतु अतिशय संदिग्धपणासुद्धां परिणामकारी कृतीच्या आड येतो—आणि त्याच दृष्टीनें ध्येयें निश्चित असणें आणि तीं कशीं साध्य करतां येतील याविषयीं स्पष्ट कल्पना असणें अगत्याचें ठरतें.

बाहेरून कांहींही लादलें न जातां प्रत्येक देशाला स्वतःचा विकास स्वतःच घडवून आणतां आला पाहिजे असें मीं यापूर्वींच सुचवलेलें आहे. साह्य आणि सल्ला हीं नेहमींच स्वागतार्ह असतात. परकीयांनीं लादलेली कोणतीही गोष्ट,

निकोप विकासाला प्रतिबंध करते आणि संघर्ष निर्माण करते. तेव्हां प्रत्येक देशाला त्याचें धोरण, तें इतर देशांना शक्य तों हानिकारक नसल्यास, त्याला पाहजे तसें आंखण्याची मोकळीक असली पाहिजे. सत्याचा मक्ता केवळ आपल्यालाच दिला आहे असें कोणीही मानणें चूक ठरेल. त्याचप्रपाणें आपल्याला जें सोयीस्कर होईल तें भिन्न परिस्थितींत राहणाऱ्या इतर लोकांना कदाचित् होणारही नाहीं हें आपण ध्यानांत ठेवलें पाहिजे. आपल्याला नापसंत असलेल्या कित्येक गोष्टींचा स्वीकार करून आपल्याला या जगांत जगावें लागतें. आपलें स्वतःचें वर्तन, आपलीं धोरणें आणि इतरांशीं स्नेहपूर्ण सहकार्य, केवळ याच गोष्टींनीं आपण इतरांच्यावर छाप पाडूं शकतों. प्रतिस्पर्धी तत्त्वप्रणालींच्या दरम्यान आज कितीही जरी भिन्नता असली तरी त्यांच्यामधील साम्य वाढत आहे आणि परिस्थिति त्यांना एकमेकांच्या अधिकाधिक जवळ आणीत आहे असें मला वाटतें. भीतीची भावना अस्तित्वांत राहिली नाहीं, धमक्या दिल्या गेल्या नाहींत किंवा सक्तीच्या मार्गांचा अवलंब केला गेला नाहीं तर त्यांना एकत्र आणण्याची ही प्रक्रिया अधिक त्वरेनें घडून येईल. याचा अर्थ असा कीं आंतरराष्ट्रीय क्षेत्राप्रमाणेंच राजकीय आणि आर्थिक क्षेत्रांतही जी वस्तुस्थिति अस्तित्वांत आहे ती तशीच मान्य केली पाहिजे असें ठळक मानानें म्हणावें लागेल. निरनिराळ्या प्रश्नांची जरूर ती सोडवणूक शांततामय मार्गांनींच केली पाहिजे.

कोणत्याही राष्ट्रामध्यें अंतर्गत संघर्ष असतात. परंतु त्यांतही थोडा फरक असतो. उदाहरणार्थ, प्रौढ मताधिकारावर आधारलेल्या लोकशाही राजव्यवस्थेंत संघर्ष निर्माण झाले तर ते नित्याच्या मार्गांनीं सोडविणें शक्य असतें. एकंदरीनें धार्मिक संघर्ष आजकाल घडून येत नाहींत. वर्णभेदात्मक संघर्ष जगाच्या कांहीं थोडच्या भागांपुरतेच जरी मर्यादित असले तरी वर्णभेदाचा प्रश्न कायमच आहे. भारतामध्यें प्रांतिक किंवा भाषिक वादावर आधारलेल्या खेदजनक संघर्षांना आम्हांला तोंड द्यावें लागत आहे. परंतु मुख्यतः वर्गकलहामुळेंच आज निरनिराळ्या समस्या निर्माण होत आहेत. अशा स्थितींत मिरासदारांचें उच्चाटन करणें ही कांहीं सोपी गोष्ट नाही. तरीहि भारतामध्यें जुने संस्थानिक, मोठमोठे जहागीरदार, जमीनदार आणि तालुकदार इत्यादि जबरदस्त मिरासदारांचे प्रश्न शांततामय मार्गांनीं सोडवले गेले परंतु खास हक्कांचा उपभोग घेणाऱ्या कांहीं निवडक लोकांना अनुकूल असलेली प्रस्थापित समाजव्यवस्था त्यासाठीं नष्ट करावी लागली. तेव्हां वर्गकलह अस्तित्वांत आहेत असें जरी आपण मान्य केलें तरीही ते शांततेच्या मार्गांनीं आपल्याला सोडवता येण्याला कांहींच हरकत नाहीं. आपल्यासमोर योग्य उद्दिष्ट असेल आणि तें लोकांना नीट समजलेलें असेल तरच शांततेचे मार्ग यशस्वी होतील.

## १४

संचय करणारा समाज हा भांडवलशाहीचा पाया असतो. असा समाज चालू युगाला तरी अनुरूप नाहीं असें मला वाटतें. यापूर्वीच्या काळांत तो कदाचित् अनुरूप झाला असेल. भांडवलशाहीनें श्रेयस्कर असें पुष्कळ मिळवलें आहे याविषयीं मला शंका नाहीं. परंतु जगाला आतां त्या अवस्थेची गरज राहिलेली नाहीं. आज जग इतकें गुंतागुंतीचें झालें आहे, तें इतकें गजबजलेलें आहे कीं त्यामुळें एकमेकांचे संबंध एकमेकांशीं पूर्णपणें निगडीत होऊन गेले आहेत. त्यामुळेंच आधुनिक विचारप्रवाहांशीं आणि परिस्थितीशीं अधिक सुसंगत होईल आणि स्पर्धेपेक्षां सहकार्यालाच जिथें अधिक वाव मिळेल अशी श्रेयस्कर समाज-रचना निर्माण करणें आवश्यक झालें झाहे. अंतीं यांतून जागतिक राज्याची निर्मिति व्हावी. परंतु ही गोष्ट, प्रत्येक राष्ट्रीय गटाला दुसऱ्याच्या व्यवहारांत ढवळाढवळ न करतां, स्वतःचा विकास घडवून आणण्याला अनुकूल असें स्वातंत्र्याचें वातावरण निर्माण झालें तरच शक्य आहे.

नफा मिळविण्याचें उद्दिष्ट पुढें ठेवून संचय करणारा समाज, नव्या विकास-मान जगाशीं जरी विसंगत असला तरी कोणत्याच प्रकारचीं प्रोत्साहनें असू नयेत असा त्याचा अर्थ होत नाहीं. प्रोत्साहन हें केवळ आर्थिक फायद्याच्या स्वरूपाचें नसलें तरी त्याची नेहमींच गरज असते. आपल्या जीवनाला धार निर्माण करण्यासाठीं आणि त्याला सार्थकता आणण्यासाठीं, साहसी आणि शोधक वृत्तीला आणि धोके पत्करण्याच्या प्रवृत्तीलाहि आपण उत्तेजन देणें जरूर असतें. खाजगी उद्योगधंद्यांच्या क्षेत्राला अद्यापहि पुष्कळ वाव आहे. परंतु या क्षेत्रांतील कार्य, संचय करण्याच्या वृत्तीनें नव्हे तर निराळयाच रीतीनें चाल-वलें गेलें पाहिजे. औद्योगिक क्रांतीची अवस्था भारतामध्यें जरा उशिरानेंच सुरू झाली. जगांतील कित्येक भाग जेट-युगांत आणि अणु-युगांत वावरत असतांना आम्हीं या अवस्थेंत नुकतेंच पदार्पण केलें आहे. तेव्हां वस्तुतः आम्हांला या दोन्ही प्रकारच्या क्रांतिकारक बदलांना तोंड द्यावयाचें असल्यामुळें आमच्यावर फार मोठी जबाबदारी आहे. समाजवाद हें आम्हीं आमचें ध्येय म्हणून ठरवलें आहे. याचें कारण केवळ तें योग्य आणि हितकर आहे येवढेंच नव्हे तर आमच्या आर्थिक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठीं त्याशिवाय दुसरा मार्गच नाहीं. शांततामय आणि लोकशाही पद्धतींनीं, कोणतीहि प्रगति झपाटयानें घडून येत नाहीं आणि त्यासाठीं हुकूमशाही आणि जबरदस्तीच्या पद्धतींचा अवलंब करावा

लागतो असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे. परंतु मला हें म्हणणें मान्य नाहीं. आज भारतामध्यें खरोखरच अशी वस्तुस्थिति आहे कीं लोकशाही पद्धतींचा त्याग करण्याचा कोणताही प्रयत्न केला गेला तर त्यायोगें फुटीरपणा निर्माण होईल आणि प्रगति घडून येण्याची कोणतीहि आशा राहाणार नाहीं. भावी काळाच्या दृष्टीनेंहि मला असेंच वाटतें कीं व्यक्तीची प्रतिष्ठा आणि व्यक्तीला जास्तींत जास्त स्वातंत्र्य देणें या गोष्टी अधिक महत्त्वाच्या आहेत. अर्थात् बहु-जिनसी समाजामध्यें व्यक्तीच्या स्वातंत्र्याला मर्यादा घालावी लागते नाहींतर तें इतरांना हानिकारक होण्याचा संभव असतो.

आपण हातीं घेतलेल्या प्रचंड कार्यामध्यें बहुजन समाजाचें पुरेपूर सहकार्य मिळणें अत्यावश्यक आहे. परंतु बहुजनसमाजाला मान्य होईल असें उद्दिष्ट आपण त्याच्यापुढें ठेवल्याशिवाय आणि त्या उद्दिष्टापासून फलप्राप्ति होईल अशी त्याची खात्री पटल्याशिवाय हें सहकार्य आपल्याला मिळणार नाहीं. जें परिवर्तन घडवून आणण्याचा आपण प्रयत्न करीत आहोंत त्याचें ओझें, ज्यांना तें सहन करण्याची शक्ति नाहीं अशा लोकांच्यावरसुद्धां पडणार आहे. या लोकांना, आपण नव्या समाज-उभारणीच्या कार्यांत भागीदार आहोंत आणि त्याचे फायदे आपल्यालाहि मिळणार आहेत असें वाटल्याशिवाय ते तें ओझें स्वीकारायला तयार होणार नाहींत किंवा पुरेपूर सहकार्यहि करणार नाहींत. ज्याला "अनिर्बंध साहस" किंवा "अनिर्बंध खासगी उद्योगधंद्यांचें क्षेत्र" म्हणून संबोधलें जातें तें आपल्या बहुसंख्य लोकांना कधींच आकर्षक वाटणार नाहीं. कारण अशा साहसामुळें आपल्या साधनसंपत्तीचा उपयोग, जीं उद्दिष्टें मूलभूत महत्त्वाचीं नाहींत अशाचसाठीं बहुधा केला जाईल. तें मूलतः नफा मिळवण्याच्या उद्देशानेंच आचरणांत आणलें जाईल आणि तें व्यक्तीला जरी हितकर वाटलें तरी एकंदर समाजाला त्याच्याविषयीं आस्था वाटणार नाहीं.

आज जगामध्यें जास्तींत जास्त तळमळ, सामाजिक न्याय आणि समानता यांच्याविषयीं आहे. जुनी सरंजामशाही पद्धत, मूठभर लोकांनीं जमीनदारी उपभोगावी आणि बाकीच्यांनीं जेमतेम जीव जगवावा या व्यवस्थेवर आधारलेली होती. त्या पद्धतीचा आज कोणीहि पुरस्कार करीत नाहीं. त्याचप्रमाणें आज प्रचलित असलेल्या कित्येक पद्धतींचाही जम नाहींसा झाला असून लोकांच्या विचारसरणीशीं किंवा वैज्ञानिक प्रगतीशीं त्या सुसंगतही राहिलेल्या नाहींत.

## १५

आम्हीं अंगीकारलेल्या कार्याचें स्वरूप लक्षांत घेतां, आम्हांला आमचें धोरण, शास्त्रीय दृष्टि ठेवून काळजीपूर्वक आंखणें जरूर आहे. असें केलें तरच आपल्याला उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीचा जास्तींत जास्त चांगल्या रीतीनें उपयोग करतां येईल, आणि राष्ट्राचे प्रयत्न आपल्या ध्येयाच्या दिशेनें चालवतां येतील. वैयक्तिक फायद्याच्या मुख्य उद्देशानें खासगी उद्योगधंदे चालवण्याच्या अर्धवट पद्धतीवर, विज्ञानाच्या या युगांत अजूनहि कांहीं लोकांचा विश्वास आहे याचें आश्चर्य वाटतें.

आमची द्वितीय पंचवार्षिक योजना अर्ध्याहून अधिक पार पडली असून तिसरी पंचवार्षिक योजना आम्हीं आंखीत आहोंत. आतां या योजनेनें आम्हांला आमचीं भरीव उद्दिष्टें आणि तीं साध्य करण्याचे मार्ग निश्चित नमूद करून ठेवले पाहिजेत अशा अवस्थेला आतां आम्ही येऊन पोंचलों आहोंत. आमच्या राष्ट्रपतींनीं संसदेपुढें केलेल्या आपल्या भाषणांत सांगितल्याप्रमाणें तिसऱ्या योजनेच्या अखेरीपर्यंत, आमचे मूलभूत उद्योगधंदे, शेतकी उत्पादन आणि ग्रामीण विकास यांच्या भावी प्रगतीचा पाया घातला जाईल आणि अशा रीतीनें स्वावलंबी आणि स्वयंप्रेरक अर्थरचना उभारली जाईल अशी आम्हांला आशा आहे. तृतीय योजना पूर्ण झाली म्हणजे त्यायोगें आमचे सर्व प्रश्न सोडवले जातील अशी आमची अपेक्षा नाहीं. त्यानंतर आम्हांला अनेक पंचवार्षिक योजना पार पाडाव्या लागतील. परंतु दारिद्र्याच्या संकटाचें निवारण करायचें. हें आमचें निश्चित ध्येय आहे. हें ध्येय साध्य झालें नाहीं तर आमचा मागासलेपणा तसाच चालू राहील. आम्हांला या कामीं यश आलें – आणि तें येईल अशी मला खात्री आहे – तर आमच्या प्रगतीचा वेग वाढेल आणि इतरांवर आम्ही तितकेसे अवलंबून राहणार नाहीं.

या कार्यामुळें आम्हांला फार मोठी जबाबदारी पत्करावी लागणार आहे. परंतु आमचीं उद्दिष्टें गांठण्याच्या दृष्टीनें झपाट्यानें प्रगति करण्याचा आमचा निर्धार असेल तर ती जबाबदारी आम्हांला टाळतां येणार नाहीं.

गेल्या कांहीं महिन्यांत शेतजमीनीसंबंधीं आम्हीं कांहीं निर्णय घेतले असून त्यावर थोडीफार टीकाही झाली आहे. कोणताही महत्त्वाचा सामाजिक बदल घडवून आणतांना अपरिहार्य अशा वर्गकलहाचेंच आपल्याला इथें प्रत्यंतर येत

आहे. अशा प्रकारचे इतरही कलह आम्हीं जसे शांततेच्या आणि सहकार्याच्या मार्गांनीं मिटवले तसाच हाही कलह मिटवूं अशी मला खात्री आहे.

आमच्या ग्रामीण जनतेसाठीं सहकार्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं असा माझा ठाम विश्वास आहे. विविध उद्दिष्टांच्या सहकारी संस्था, त्यासाठीं आवश्यक असून त्यांतूनच सहकारी शेती निर्माण होईल. सामुदायिक शेती, सद्य:स्थितींत भारताला सोयीस्कर नाहीं. असें मला वाटतें. आमच्या शेतकऱ्यांनीं एकाद्या यंत्राचे निर्जीव भाग बनावें असें मला मुळींच वाटत नाहीं. आमच्या देशांत लोकसंख्या फार मोठी आहे आणि त्या मानानें शेतजमीनीचें प्रमाण फार कमी आहे ही गोष्ट आम्ही ध्यानांत ठेवणें जरूर आहे, विविध मुद्यांवर वाद माजत आहेत ही एकच वस्तुस्थिति, आमची प्रगति होत आहे आणि आम्ही युगानुयुगें चालत आलेल्या आर्थिक चाकोरींतून बाहेर पडत आहोंत याची निदर्शक आहे.

केवळ कोणत्याही सिद्धान्तानें–तो कितीही चांगला असला तरी–आम्ही आमच्या बहुजन समाजामध्यें उत्साह निर्माण करूं शकणार नाहीं. शेतकऱ्यांच्या ठिकाणीं एकंदर परिस्थितीची जाणीव निर्माण करणें, त्यांना सहकार्य करायला लावणें आणि त्यांना स्वावलंबी बनवणें हेंच आमचें अवश्यमेव धोरण असलें पाहिजे. याच दृष्टीनें ग्रामपंचायतींना आणि ग्रामीण सहकारी संस्थांना अधिकार देणें महत्त्वाचें आहे. या संस्था त्या अधिकारांचा दुरुपयोग करतील हें म्हणणें जरी कांहींसें समर्थनीय असलें तरी त्यांत वस्तुत: तथ्य नाहीं. थोडासा धोका आपल्याला पत्करावाच लागेल. केवळ प्रयत्न करून आणि चुका करूनच लोक शिकूं शकतील.

समाजविकासाची मोहीम, भारतामध्यें साडेसहा वर्षांपूर्वी सुरूं झाली आणि तिचा लाभ आतां तीन लाखांहून अधिक खेडयांना मिळत आहे. ही प्रगति उल्लेखनीय असून या मोहिमेनें, देशामध्यें क्रांतिकारी बदल कांहीं अंशीं घडवून आणले आहेत आणि तसे बदल तिच्यामुळें आणखीही घडून येतील असें मला वाटतें. या मोहिमेंतील उणिवांची मला पूर्ण जाणीव आहे. परंतु तिच्यापासून मिळणारें यश त्याहीपेक्षां श्रेष्ठ आहे. लोकांचें साहचर्य किती मिळतें यावरच खरी फलनिष्पत्ति अवलंबून राहील. अधिकारी आणि प्रशिक्षित कार्यकर्ते यांचें महत्त्व आहे. परंतु खरी भूमिका सर्वसाधारण शेतकऱ्यानेंच बजावायची आहे. समाजविकासयोजनेमुळें एक नवें उत्साही वातावरण पसरत आहे असें मला वाटतें.

शेतकी, उद्योगधंदे किंवा शासनव्यवस्था यापैकीं कोणत्याही क्षेत्रांतील कार्याचें स्वरूप वेळोंवेळीं बदलत गेलें तर त्याप्रमाणें त्या संस्थांमध्येंही बदल घडवून आणणें जरूर पडतें आणि नफा मिळवण्याच्या मुख्य हेतूवर आधारलेल्या जुन्या,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
वि:
अनुक्रम

स्वार्थ संचय करणाऱ्या समाजाचीं मार्गदर्शक मूल्यें जाऊन नवीं मूल्यें त्यांच्या जागीं आस्तित्वांत येतात. हें संपूर्ण परिवर्तन घडून येण्याला कालावधि लागणें स्वाभाविकच आहे. कारण आम्हांला कोटचवधि लोकांच्या आचारविचारांत बदल घडवून आणायचा आहे आणि हा बदल लोकशाही पद्धतीनें आणि लोकांच्या संमतीनें घडवून आणायचा आहे. परंतु या परिवर्तनाची गति मंद असलीच पाहिजे असें नाहीं. किंबहुना परिस्थिति लक्षांत घेतां ही गति मंद असून भागणारही नाहीं.

आशा निराशा, उल्लेखनीय प्रगति आणि त्याचबरोबर गतिशून्यता, नव-चैतन्य आणि गतकाळाचा आणि खास हक्कांचा निर्जीवपणा, एकंदरीनें वाढत्या ऐक्याची भावना आणि अनेक फुटीर प्रवृत्ति, अशा अनेक परस्परविरोधी वृत्ति-प्रवृत्तींचें मिश्रण आज भारतामध्यें आपल्याला दिसतें. त्याचबरोबर लोकांच्या आचार-विचारांत एक प्रकारची खळबळ आहे, फार मोठा जोम आहे असें आपल्याला आढळून येतें. कदाचित्त सतत बदलत असलेल्या या काळांतच आपण राहत असल्यामुळें जें कांहीं घडत आहे त्याचा संपूर्ण अर्थ आपल्या नेहमींच ध्यानांत येतो असें नाहीं. अशा परिस्थितीचें योग्य आकलन, त्रयस्थांनाच अधिक चांगलें होणें शक्य आहे.

जो देश आणि जे लोक आपल्या प्राचीन इतिहासाशीं पूर्णपणें निगडीत आहेत आणि ज्यांनीं गतकाळांत प्रत्येक परिवर्तनाला तीव्र विरोधच केला, त्यांनीं झपाटचानें आणि निश्चयानें प्रगतिपथावर आगेकूच करावें ही एक आश्चर्याचीच गोष्ट आहे. आपल्याला कदाचित् जाणीवही नसेल परंतु आपण भारतामध्यें इतिहास निर्माण करीत आहोंत.

चालू पिढींतील खळबळीची आणि तिच्या परिश्रमांची फलनिष्पत्ति काय होईल ? उद्यांच्या भारताचें स्वरूप काय राहील हें मी सांगूं शकत नाहीं. मी फक्त माझ्या आशा आणि इच्छा व्यक्त करूं शकतों. आधिभौतिक क्षेत्रांत भारताची प्रगति व्हावी आणि आपल्या अमर्याद लोकसंख्येचें जीवनमान सुधारण्यासाठीं भारताच्या पंचवर्षीय योजनांची परिपूर्तता व्हावी हीच माझी स्वाभाविक इच्छा आहे. धर्माच्या, जातीच्या, भाषेच्या किंवा प्रांताच्या नांवाखालीं संकुचित वृत्तीनें भारतामध्यें आज जे झगडे चालू आहेत ते थांबले पाहिजेत आणि प्रत्येक व्यक्तीला तिच्या लायकी आणि कर्तबगारीनुसार, स्वतःचा विकास घडवून आणण्याला पूर्ण वाव मिळेल असा वर्गविहीन आणि जातिविहीन समाज उभारला गेला पाहिजे. विशेषतः जातिभेदाचें हें लांछन नाहींसें केलें जाईल अशी मला आशा आहे. कारण जातिभेद असेतोंपर्यंत, लोकशाही किंवा समाजवाद यापैकीं कांहींच शक्य नाहीं.

चार थोर धर्मांनीं भारताला प्रभावित केलें आहे. त्यांपैकीं हिंदुधर्म आणि बौद्धधर्म हे भारतीय विचारसरणींतून उदयाला आले आणि ख्रिश्चन आणि इस्लाम हे दुसरे दोन धर्म परदेशांतून आले. परंतु त्यांनीं भारतामध्यें आपलें कायमचें बस्तान बसवलें. धर्माची जुनी कल्पना आज विज्ञानाशीं विसंगत आहे. परंतु धर्माचा संबंध, हटवादी तत्त्वांशीं किंवा निरर्थक सभारंभांशीं न राहतां जीवनाच्या उच्चतर तत्त्वांशीं राहिला तर धर्माधर्मांदरम्यान किंवा धर्म आणि विज्ञान यांच्या दरम्यान संघर्ष निर्माण होण्याचें कांहींच कारण नाहीं. हा समन्वय साधण्याच्या कामीं सहाय्य करण्याचा बहुमान भारताला मिळणें शक्य आहे. अशोकाच्या शिलालेखांमध्यें कोरून ठेवलेल्या भारताच्या प्राचीन परंपरेशीं सुसंगत अशीच ही गोष्ट आहे. अशोकाचा संदेश आपण ध्यानांत ठेवण्यासारखा आहे,

"आध्यात्मिक सामर्थ्याची वाढ अनेक प्रकारें होते. परंतु तिचें मूलतत्त्व आपल्या वाणीवर संयम राखणें आणि दुसऱ्याच्या धर्माला तुच्छ न लेखतां किंवा त्याच्याविषयीं अनादरानें न बोलतां, स्वतःच्या धर्माची प्रशंसा टाळणें हेंच आहे".

"उचित प्रसंग येतांच, परधर्मीयांचा योग्यतो आदरही केला गेला पाहिजे. अशा रीतीनें आपण स्वधर्मीयांचा आदर करतों इतकेंच नव्हें तर परधर्मीयांनाही आपण साह्य करतों. याच्या उलट वागण्यानें आपण स्वधर्माची तर हानि करतोंच पण इतरांच्याही धर्माचें नुकसान करतों. स्वधर्मावरील निष्ठेमुळें आणि आपला धर्म इतर सर्व धर्मांहून श्रेष्ठ आहे असें दाखवण्याच्या हेतूनें जो स्वधर्माची प्रशंसा करतो आणि परधर्माची निंदा करतो तो निःसंशय स्वतःच्या धर्माची हानि करतो."

अशोकाच्या काळांत धर्ममध्यें सर्व प्रकारच्या श्रद्धेचा आणि कर्तव्यांचा अंतर्भाव होत असे. आज आम्ही धर्मासंबंधीं तितकेंसें भांडत नाहीं. राजकीय आणि आर्थिक प्रश्नांवरून आणि तत्त्वप्रणालीवरूनच आमचीं विशेष भांडणें होतात. राजकीय किंवा आर्थिक बाबतींत ज्यांच्याशीं आमचे मतभेद आहेत त्यांच्याशीं वागतांना अशोकाचा उपदेश आम्हीं ध्यानांत ठेवणें जरूर आहे. अशोकाच्या मनांत प्रचार–युद्धाला वावच नव्हता, आजही तो असण्याचें कारण नाहीं.

उद्यांच्या भारताची घडण आजच्या आमच्या परिश्रमांवर अवलंबून आहे. औद्योगिक आणि इतर क्षेत्रांत भारताची उन्नति होईल, विज्ञानांत आणि तंत्रशास्त्रांत त्याची प्रगति होईल, आमच्या लोकांचें जीवनमान वाढेल, शिक्षणाचा प्रसार होईल, आरोग्य सुधारण्यासाठीं अनुकूल परिस्थिति निर्माण होईल आणि कला आणि संस्कृति, लोकांचें जीवन समृद्ध करतील याविषयीं मला मुळींच शंका नाहीं. निश्चित ध्येय पुढें ठेवून शुद्ध अन्तःकरणानें आम्ही या तीर्थयात्रेला

दा. क्र.

निघालों आहोंत – आमचा हा प्रवास कितीही लांबचा असला तरी आम्ही आमच्या इच्छित स्थळीं पोंचूं अशी आम्हांला खात्री आहे.

परंतु मला जी चिंता आहे ती केवळ आमच्या भौतिक प्रगतीविषयींच नव्हे तर आमच्या लोकांचें शील आणि त्यांच्या मनाची सखोलता यांविषयीं आहे. औद्योगिक प्रगतीनें सामर्थ्य प्राप्त झाल्यामुळें वैयक्तिक संपत्ति आणि सुखी जीवन साध्य करून घेण्याच्या प्रयत्नांत आम्ही आमचें व्यक्तिमत्त्व तर गमावणार नाहीं ना ? तसें झालें तर ती एक शोकान्तिका ठरेल. कारण त्यामुळें ज्या व्यक्तिमत्त्वाबद्दल भारताची गतकाळांत प्रसिद्धी होती आणि मला वाटतें वर्तमान काळांतही जें व्यक्तिमत्त्व गांधीजींच्या जीवनांत प्रतीत झालें तें नाहींसें होईल. सामर्थ्य आवश्यक आहे पण सुज्ञपणाचीही तितकीच गरज आहे. सत्तेला शहाणपणाची जोड मिळाली तरच तें चांगलें असतें.

आज आपण सर्वजण अधिकारांची आणि खास हक्कांची भाषा बोलतों आणि त्यांची मागणी करतों. परंतु आमचा जुना धर्म आमच्या कर्तव्याविषयीं आणि जबाबदाऱ्यांविषयीं आम्हांला सांगतो. कर्तव्यें पार पाडल्यानंतरच अधिकार प्राप्त होतात.

विज्ञानाच्या आणि तंत्रशास्त्राच्या प्रगतीची मानसिक आणि आत्मिक प्रगतीशीं सांगड घालणें आपल्याला शक्य आहे का ? हाच मुख्य प्रश्न आहे. विज्ञानाशीं आपण प्रतारणा करूं शकणार नाहीं. कारण तें आजच्या जीवनाचें मूलभूत तत्त्व आहे. परंतु ज्या आवश्यक तत्त्वांचा आम्ही गतकाळांत शेकडों वर्षें पुरस्कार करीत आलों त्यांच्याशीं प्रतारणा करणें त्याहूनही शक्य नाहीं. तेव्हां आपलें सर्व शक्तिसामर्थ्य एकवटून आपण औद्योगिक प्रगतीच्या मार्गानें गेलें पाहिजे आणि त्याचबरोबर सहिष्णुता, दया आणि सुज्ञपणा यांच्याशिवाय भौतिक संपत्ति मातिमोल ठरेल हेंही आपण ध्यानांत ठेवलें पाहिजे. शांततेचा पुरस्कार करणारे धन्य होतात हें आपण विसरून चालणार नाहीं.

REFBK-0010854
...राठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
...नुक्रम ........... वि:
...मांक ........ नों: दि: